अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
कॉन्ट्यूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222



संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०७.११.२०२५ | अंक नं. १८० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

संकष्ट चतुर्थी शनिवार दि.८ नोव्हेंबर चंद्रोदय ०८.३३ मि.
उपवासासाठी स्पेशल टक्कर मलाई लस्सी
कैलास उडपी | लस्सी
शाखा नं. १ : शिवशक्ती अपार्टमेंट, खिस्त गल्ली, पिराजवळ, अहिल्यानगर.
शाखा नं. २ : तहसील कार्यालया समोर, टीव्ही सेंटर, सावेडी, अहिल्यानगर.
शाखा नं. ३ : पद्मावती पेट्रोल पंपाजवळ, नगर मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर.
स्वादिष्ट रेलचेल...बटाटा वडा सांबर-उडीद वडा सांबर-टेस्टी इडली सांबर- दही वडा- मसाला डोसा-टोमॅटो आम्लेट-उत्तप्पा- खास खुशखुशीत काला सोना,

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

सर्व दागिन्यांची प्रतीग्रॅम घडणावळ ₹ 888/-*
डबल फायदा
जेवढ्या वजनाचे सोने तेवढ्या वजनाची चांदी चक्क फ्री*
चंदुकाका ज्वेल्स सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

खास महानगरपालिका निवडणुकीसाठी डिस्काऊंट...
राहण्याची सोय
मामाचा मळा कृषी पर्यटन केंद्र
हुरडा पार्टी आपल्या सेवेत उपलब्ध..
*पत्ता : नगर-सोलापूर रोड, रुईछत्तीसी, अ.नगर
Water Park
वॉटर पार्क
निसर्गरम्य हुरडा पार्टी
बुकींग सुरू..
रेन डान्स
जंपिंग टेबल
चुलीवरचे जेवण
मिकी माऊस
बुल राईड
स्वीमिंग टँक, रेन डान्स, कोलंबस, ट्रॅक्टर राईडस, अॅडव्हेंचर गेम व इतर बरेच काही...
फक्त 200/- / 100 /- रुपयांत
मो : 98 90 77 25 20, 9730979700
नगर-सोलापूर रोड, नगरपासून १५ मिनिटांच्या अंतरावर, रुईछत्तीसी

SONI TILES Since 1965 AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

# नो पार्किंगच्या नावाखाली वाहनचालकांची होतेयं 'लुट'

## अव्वाच्या सव्वा दंड वसुली, नागरिकांची महानगरपालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे तक्रार

नगर – शहरात अनेक ठिकाणी नो पार्किंगचे बोर्डही लावलेले नसताना महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून वाहनांवर कारवाई केली जात असून, अव्वाच्या सव्वा दंड वसूल करून वाहनचालकांची अक्षरशः लुट केली जात आहे, अशी तक्रार त्रस्त नागरिकांनी आयुक्तांकडे केली असून, ही लुट थांबविण्याची मागणी केली आहे.

याबाबत अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांना अमृतलाल कोठारी (रा.बुरुडगाव रोड, साईनगरजवळ) यांनी निवेदन दिले आहे. त्यात म्हटले आहे की, आपण ३ नोव्हेंबर रोजी आनंदधाम कॉर्नर येथे मोपेड गाडी उभी केली होती. सदर गाडी महानगरपालिका कर्मचाऱ्यांनी उचलून नेली. वास्तविक 'नो पार्किंग बोर्ड' पुढे आहे. मी बुरुडगाव रोड येथून आंनदधाम येथे आलो होतो. बोर्ड पुढे असल्यामुळे दिसण्याचा प्रश्नच येत नाही. त्या दिवशी तेथून १२ ते १५ गाड्या कर्मचारी घेऊन गेले. चूक नसताना मला ८७५ रुपयांचा दंड केला. याबाबत कर्मचाऱ्यांना विचारले असता 'तो आमचा नियम आहे'. सदरची यादी जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालय, पोलिस स्टेशनला जाते. त्याला जीएसटी पण लागतो, असे सांगण्यात आले.

वास्तविक पोलिस 'नो पार्किंग'चा दंड करून २५० ते ३०० रुपयांची पावती देतात, मात्र महापालिका कर्मचाऱ्यांनी एवढा दंड का घेतला, त्याचे कारण कर्मचारी देत नव्हते. असा शासनाचा कोणता जीआर आहे की ८७५ रुपये सेवार्थ पावती घ्यावी, याचा खुलासा आम्हाला करावा, तसेच आपण प्रत्यक्ष आनंदधाम येथे येवून 'नो पार्किंग' बोर्डची पाहणी करावी, असेही कोठारी यांनी म्हटले आहे.

आमच्या कर्मचारी गाड्या घेऊन गेल्यानंतर तेथे महिला, लहान मुले, वयस्कर लोकांचा गोंधळ उडाला. प्रत्येकाला वाटत होते की, आमची गाडी चोरीला गेली का? मात्र तेथे एक अपंग व्यक्ती होती, त्याने सांगितले की, महापालिका कर्मचारी गाड्या घेऊन गेले. सदर अपंग व्यक्तीची पण गाडी घेऊन गेले. त्यांनी कर्मचारी वर्गाला विनंती केली की, मी पायाने अपंग आहे. माझा मुलगा आनंदधाम येथे दर्शनाला गेला आहे. ४ ते ५ मिनिटात येईल, पण आपल्या कर्मचाऱ्यांनी अपंग व्यक्तीची विनंती अमान्य करुन त्यांची पण गाडी घेऊन गेले. या ठिकाणी 'नो पार्किंग बोर्ड' पुढे आहे, याची कल्पना दुचाकी वाहनचालकांना नाही, त्यामुळे तेथे दुचाक्या लागल्या. वास्तविक दुचाकीवाल्यांची काही एक चुक नाही, नो पार्किंगचा बोर्ड कोठे लावावा, याचे साधे ज्ञान कर्मचारी वर्गाला असू नये का? तसेच ८७५ रुपये दंड वसुली करताना कर्मचाऱ्यांची अरेरावी व उध्दटपणाचा सर्वांना अनुभव आला. तरी अशा पद्धतीने वाहनचालकांची सुरु असलेली लुट थांबवावी, अशी मागणी कोठारी यांनी केली आहे.

### मनमानी पद्धतीचा कारभार थांबवा अन्यथा आंदोलन

सावेडी उपनगरातही प्रोफेसर कॉलनी चौक येथून दररोज मनमानी पद्धतीने दुचाक्या उचलल्या जात आहेत. या ठिकाणी तर कुठल्याही प्रकारचा नो पार्किंगचा बोर्ड नाही. रस्तावर साईडपट्टी नाही. तरी अशा मनमानी पद्धतीने सुरु असलेल्या प्रकाराला आळा घातला नाही तर महापालिकेसमोर आंदोलन करण्याचा इशारा सामान्य नागरिक व ज्येष्ठ नागरिक विचार मंचच्या वतीने विपुल वाखुरे यांनी दिला आहे.

वाहनचालकांना शिस्त लावा पण नो पार्किंगचे बोर्ड पासुन रोड ला कलर पट्या मारा, या ठिकाणी नो पार्किंग झोन आहे, हे वाहनचालकांना कळू द्या, असेही वाखुरे यांनी म्हटले आहे.

पोखरणा ज्वेलर्सच्या सर्जेपुरा व सथ्था कॉलनी शाखेसाठी पाहिजेत

| पद | पगार | जागा |
| --- | --- | --- |
| अकौंटंट | 25 ते 30 हजार | 3 |
| कॅशिअर | 20 ते 25 हजार | 3 |
| सेल्समन | 20 हजार + इन्सेन्टीव्ह | 10 |
| ऑफिसबॉय | 13 ते 15 हजार | 4 |

अनुभवींना प्राधान्य, इच्छुकांनी १० दिवसांच्या आत अर्जासह खालील पत्त्यावर समक्ष भेटावे.
पोखरणा ज्वेलर्स
साईदीप टॉवर, सबलोक पेट्रोलपंप शेजारी, सर्जेपुरा, अहिल्यानगर.
कृष्णरत्न टॉवर, सथ्था कॉलनी, स्टेशन रोड, अहिल्यानगर.

पाहिजेत अहिल्यानगर जिल्ह्यातील नामांकित सुवर्णपेढी चंदुकाका ज्वेलर्स अहिल्यानगर या मुख्य शोरूम साठी हवे आहेत
मॅनेजर जागा-1 (M) पदवीधर व तत्सम पदावर किमान ५ वर्षे काम केल्याचा अनुभव आवश्यक पगार : ३० ते ३५ हजार
सेल्समन जागा-5 (M/F) तत्सम पदावर काम केल्याचा किमान 2 वर्ष अनुभव आवश्यक पगार : १८ ते २० हजार
मोड रिपेअरिंग कारागिर जागा-2 (M) सोन्या चांदीच्या दागिन्यांची मोड घेण्याचा किंवा रिपेअरिंग करण्याचा किमान ५ वर्ष अनुभव आवश्यक. पगार : १८ ते २० हजार
अनुभवींना प्राधान्य, आकर्षक पगार दिला जाईल.
इच्छुकांनी सविस्तर अर्ज बायोडाटा सह 7 दिवसांच्या आत समक्ष भेटावे.
शुध्दता, विश्वासार्हता, पारदर्शकता
चंदुकाका ज्वेलर्स - सोने, चांदी व हिऱ्याचे व्यापारी -
वसंत टॉकिज रोड, अहिल्यानगर 0241-2321512

कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रुट दुकानदारांना संपर्क करा
रत्नकमल चहा
एक किलो मागे एक कोलगेट ब्रश फ्री..फ्री..
ब्रँडेड कंपनीचा चहा व रत्नकमल चहा एक वेळेस जरुर तुलना करुन पहा
आशिष ट्रेडर्स
चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते
रत्नकमल, बुरुड गल्ली, मारुती मंदिरासमोर, अहिल्यानगर- ४१४००१
Contact : 8767369367
इतर कंपन्या पेक्षा 50 ते 70 रुपये कमी किलो मागे स्वस्त दर्जा त्यापेक्षाही उत्तम.

PVC Manhole Cover
सर्व साईज मध्ये उपलब्ध आहे



Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
8975979999 / 9822542011
ABHAY SALES CORPORATION & HARDWARE

FOR - B.COM, M.COM, BBA, BBCA, MBA STUDENT
CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
COURSE DETAILS
COMPUTER APPLICATION | TAXATION, BANKING | ADVANCE ACCOUNTING | AUDITING
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
100% JOB ASSISTANCE
DiSHA® COMPUTER INSTITUTE An ISO 9001:2015 Certified
IN JUST 17900/-
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001 9371051769
Old ST stand Branch: Office No.140, 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, Ahmednagar-414001 9371151769
Pipeline Branch: Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## धनादेश न वटल्यामुळे कर्जदारास एक महिन्याची शिक्षा आणि दंड

नगर – श्रीराम ट्रान्सपोर्ट फायनान्स कंपनीकडुन घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी दिलेला धनादेश न वटल्या प्रकरणी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी एस.आर. शिंदे यांनी कर्जदारास १ महिना साध्या कारावासाची व ५५ लाख ६९ हजार २८० रुपये दंडाची तसेच दंड न भरल्यास आणखी १० दिवस कारावास अशी शिक्षा सुनावली आहे. महेश शांताराम गुंड (रा. निघोज रोड, वडगाव गुंड, ता. पारनेर) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.

आरोपी गुंड यांनी श्रीराम ट्रान्सपोर्ट फायनान्स कंपनीकडुन ब्रेकर ०१४० हे खरेदी करण्याकरीता ३९ लाख ३१ हजार ५०० रुपयांचे कर्ज घेतलेले होते. सदर कर्जाची फेड महेश गुंड यांनी न केल्याने सदर कर्जाचे परतफेडीपोटी त्यांनी फायनान्स कंपनीस रक्कम रुपये २९ लाख ३१ हजार २०० रुपयांचा धनादेश ८ ऑगस्ट २०१९ रोजी दिलेला होता. सदरचा धनादेश न वटता परत आल्याने फिर्यादी कंपनीने महेश शांताराम गुंड यांचे विरुध्द नगर येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांचेकडे निगोसिएबल इन्स्टुमेंट कायदा १३८ अन्वये केस दाखल केलेली होती.

सदर केसमध्ये फिर्यादी कंपनीचे वतीने विकास बाळासाहेब बडे यांनी दिलेली साक्ष ग्राह्य धरुन अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी एस.आर. शिंदे यांनी आरोपीस १ महिना साध्या कारावासाची व ५५ लाख ६९ हजार २८० रुपये दंडाची तसेच दंड न भरल्यास आणखी १० दिवस कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर केसमध्ये फिर्यादी कंपनीतर्फे अ‍ॅड. पोपट ज्ञानदेव म्हस्के यांनी कामकाज पाहिलेले आहे.

## अभियंत्याच्या घरी भरदिवसा चोरी; सव्वातीन लाखांचा ऐवज लंपास

नगर – कुटुंबासह बाजारपेठेत खरेदीसाठी गेलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंत्याच्या घरी चोरट्यांनी भरदिवसा चोरी करत सोन्या– चांदीचे दागिने व रोख रक्कमेसह ३ लाख १४ हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. ही घटना ५ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ ते ४.४५ वाजण्याच्या दरम्यान तपोवन रोडवरील कसबे वस्ती येथे घडली.

याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता अविनाश जालिंदर गुंड (वय ३१, रा. कसबे वस्ती, तपोवन रस्ता, सावेडी, अहिल्यानगर, मुळ रा. वाघळुज, ता. आष्टी, जि. बीड) यांनी ६ नोव्हेंबर रोजी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी गुंड हे ५ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता पत्नी व मुलगी यांच्या सोबत कापडबाजारात खरेदीसाठी गेले होते. जाण्यापूर्वी त्यांनी घराच्या दरवाजाला व्यवस्थित कुलूप लावले होते. सायंकाळी ४.४५ वाजता परत आल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, घराच्या दरवाजाची कडी तुटलेली आहे. आत प्रवेश केल्यानंतर बेडरूममधील कपाटातील वस्तू अस्ताव्यस्त दिसल्या.

त्यांनी तात्काळ नातेवाईक व फ्लॅटचे मालकाला संपर्क करून माहिती दिली. त्यानंतर त्यांनी थेट तोफखाना पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. फिंगरप्रिंट तज्ञ व डॉग स्क्वॉड यांना पाचारण करून तपास करण्यात आला. तपासादरम्यान कपाटातील लॉकर फोडून चोरट्यांनी रोख रक्कम व दागिने चोरल्याचे निष्पन्न झाले. यामध्ये १५ ग्रॅमची सोन्याची चैन, एक ग्रॅमचे सोन्याचे कानातील व सटवाई, चांदीचे पैंजण, चांदीचे जोडवे व २ लाख ५० हजार रूपयांची रोख रक्कम असा एकुण ३ लाख १४ हजार ७०० रूपयांचा ऐवज चोरीला गेला आहे. याप्रकरणी गुंड यांच्या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३३१ (३), ३०५ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.





‘वंदे मातरम्’ या गीताच्या सार्धशताब्दी महोत्सवानिमित्त जिल्हा क्रीडा संकुल येथे सांस्कृतिक कार्य विभाग, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग तसेच अहिल्यानगर जिल्हा व तालुकास्तरीय ‘वंदे मातरम’ सार्धशताब्दी महोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य सामूहिक गीतगायनाचे आयोजन करण्यात आले.

## सार्धशताब्दी महोत्सवनिमित्त नगरच्या जिल्हा क्रिडा संकुलात अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि नागरिकांनी केले ‘वंदे मातरम’ गीताचे ‘सामूहिक गायन’

नगर – ‘वंदे मातरम्’ या गीताच्या सार्धशताब्दी महोत्सवानिमित्त जिल्हा क्रीडा संकुल येथे सांस्कृतिक कार्य विभाग, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग तसेच अहिल्यानगर जिल्हा व तालुकास्तरीय ‘वंदे मातरम’ सार्धशताब्दी महोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य सामूहिक गीतगायनाचे आयोजन करण्यात आले.

सर्व उपस्थितांनी एकत्रितपणे संपूर्ण ‘वंदे मातरम्’ या गीताचे उत्साहात समूहगायन केले. ‘वंदे मातरम्’ च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमला.

कार्यक्रमास महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, उपवनसंरक्षक धर्मवीर साळविठ्ठल, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, पोलीस उपअधीक्षक दिलीप टिपरसे, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील, तहसीलदार संजय शिंदे, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय नाशिकचे सहाय्यक संचालक बाळासाहेब जाधव, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुनील शिंदे, तसेच कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त रवीकुमार पंतम आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते अ‍ॅड. आनंद गांधी यांनी आपल्या भाषणातून ‘वंदे मातरम’ गीताचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित केले. कै. माणिकराव नरसिंगराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रशिक्षणार्थिनींनी सादर केलेल्या लघुनाटिकेतून देशभक्तीचा प्रभावी संदेश दिला. कार्यक्रमामुळे संपूर्ण जिल्हा क्रीडा संकुल देशभक्तीच्या भावनेने दुमदुमून गेले.

प्रास्ताविक भाषणात संस्थेचे प्राचार्य खालिद जहागीरदार यांनी ‘वंदे मातरम’ या गीताच्या इतिहासावर प्रकाश टाकला. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुनील शिंदे यांनी उपस्थित आभार मानले. कार्यक्रमास सर्व विभागांतील अधिकारी, कर्मचारी, शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच नागरिक उपस्थित होते.

## गोवंशीय जनावरांची हाडे, शिंगे वाहतूक करणारा पिकअप पकडला

### केडगाव बायपास रस्त्यावर कारवाई; ४ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त

नगर – गोवंशीय जनावरांची कत्तल करून त्यांची हाडे, शिंगे याची बेकायदेशीरपणे वाहतूक करणारा पिकअप गोरक्षकांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिला आहे. ही कारवाई केडगाव बायपास रोडवर ६ नोव्हेंबर रोजी पहाटे करण्यात आली आहे. पोलिसांनी १५०० किलो हाडे, शिंगे व पिकअप असा ४ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

कोतवाली पोलिसांचे पथक रात्रगस्त घालत असताना त्यांना पहाटे ३.५० च्या सुमारास केडगाव बायपास रस्त्यावर हॉटेल मानकर जवळ गोरक्षकांनी एक पिकअप पकडला असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तातडीने तेथे धाव घेतली. त्यावेळी गोरक्षक ऋषिकेश थोरात, सागर भांबरे, अमर सैंदर यांनी एक महिंद्रा पिक अप (एमएच २० जी सी ४४१६) थांबवून ठेवल्याचे आढळून आले. पोलिसांनी त्या पिक अप ची पाहणी केली असता त्यात गोवंशीय जनावरांची कत्तल करून त्यांची हाडे, शिंगे असल्याचे दिसून आले. तो सुमारे १५०० किलोचा मुद्देमाल होता. चालकाकडे पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या कडील परवाना तसेच हाडांची वाहतूक करण्याचा परवाना नसल्याने पोलिसांनी सदर पिक अप मुद्देमालासह ताब्यात घेतला. या प्रकरणी पो.कॉ.अर्जुन फुंदे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून पिकअप चालक मिर्झा शकील बेग (वय ४२, रा. कैलास नगर, छत्रपती संभाजीनगर) याच्या विरुद्ध बीएनएस कलम २७१ सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण (सुधारणा) अधिनियम १९९५ चे कलम ५ (क), ९ (अ) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

## महिलेच्या दागिन्यांची चोरी

नगर – एसटी बसने प्रवास करणाऱ्या महिलेच्या पर्स मधून सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरल्याची घटना तारकपूर बसस्थानक ते छत्रपती संभाजी नगर रोडवरील चेतना हॉटेल या दरम्यान २४ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.१५ ते ८.४५ या कालावधीत घडली आहे. याप्रकरणी ६ नोव्हेंबर रोजी तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत तेजल अभिजित खुळे (वय २९, रा. पाईपलाईन रोड) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या बाहेरगावी जाण्यासाठी २४ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.१५ तारकपूर बसस्थानकात पुणे ते जळगाव या एस टी बस मध्ये बसल्या. बस प्रवास करत असताना तारकपूर बसस्थानक ते छत्रपती संभाजी नगर रोडवरील चेतना हॉटेल दरम्यान अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्स मधून २५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरले असल्याचे त्यांनी फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध बीएनएस कलम ३०५ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## नगरमध्ये गॅस रिफीलिंग सेंटरवर छापा

नगर – घरगुती गॅस सिलेंडर मधून बेकायदेशीर पणे वाहनांमध्ये गॅस रिफीलिंग करणाऱ्या सेंटरवर पुरवठा विभागाने छापा टाकत ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई ६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० च्या सुमारास स्टेशन रोडवरील लोखंडी पुलाजवळील रॉयल ग्लास वर्क च्या पाठीमागील मोकळ्या जागेत असलेल्या पत्र्याच्या शेड मध्ये करण्यात आली. हे गॅस रिफीलिंग सेंटर चालविणाऱ्या अज्ञात व्यक्ती विरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शहर अन्न धान्य वितरण अधिकारी कार्यालयातील पुरवठा निरीक्षक तेजस बाबूलाल पाटील यांनी फिर्याद दिली आहे. लोखंडी पुलाजवळील रॉयल ग्लास वर्क च्या पाठीमागील मोकळ्या जागेत असलेल्या पत्र्याच्या शेड मध्ये गॅस रिफीलिंग सेंटर सुरु असून या ठिकाणी घरगुती गॅस सिलेंडर मधून बेकायदेशीर पणे वाहनांमध्ये गॅस रिफीलिंग केले जात असल्याची माहिती पुरवठा विभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे पुरवठा विभागाच्या पथकाने पोलिसांच्या समवेत जावून तेथे छापा टाकला. या पथकाची चाहूल लागताच सेंटर चालक तेथून पसार झाला. या पथकाला त्या ठिकाणी ७ रिकामे गॅस सिलेंडर, वजन काटा, रिफिलिंग मशीन, नोझल असा मुद्देमाल आढळून आला पथकाने तो जप्त केला. या प्रकरणी अज्ञात सेंटर चालकावर बी.एन.एस. कलम २८७, २८८, १२५, ३(५) सह जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ३, ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ‘तरुणाचे अपहरण’ हा बनाव असल्याचे तपासात झाले उघड

### पोलिसांना खोटी माहिती दिल्याने ५ जणांवर गुन्हा दाखल

नगर – नगर तालुक्यातील हातवळण येथे २५ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ च्या सुमारास झालेल्या तरुणाच्या अपहरण प्रकरणात पोलिस तपासात वेगळीच माहिती समोर आली असून तो स्वताच लपून बसला आणि त्याच्या पत्नीने त्याच्या अपहरणाची फिर्याद दिली. त्यामुळे खोटी माहिती सांगून पोलिसांची दिशाभूल केल्या प्रकरणी त्या तरुणासह त्याची पत्नी, वडील, सासू, सासरे यांच्या विरुद्ध नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अपहरणाच्या गुन्ह्याचे तपासी अधिकारी पोलिस उपनिरीक्षक भरत धुमाळ यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार तुकाराम महादेव यादव, त्याची पत्नी सुमन तुकाराम यादव, वडील महादेव सावळेराव यादव (तिघे रा. हातवळण, ता.नगर), सासरे रामदास उध्दव सोनसळे, सासु सिंधुबाई रामदास सोनसळे (दोघे रा.शेंडी, ता.नगर) यांच्या विरुद्ध बीएनएस कलम २११, २१२, २१७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील सुमन यादव हिने २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी नगर तालुका पोलिस ठाण्यात आपले पती तुकाराम महादेव यादव यांचे गणेश कवडे, माऊली पठारे, सुनिल दिलीप पठारे, अक्षय भंडारे (सर्व रा.बनपिंप्री, ता. श्रीगोंदा) यांनी जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने उचलुन नेवुन अपहरण केले आहे. तसेच सलून दुकानाची तोडफोड केली आहे, अशी फिर्याद दिली होती. त्यावरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक भरत धुमाळ हे करत होते. या तपासादरम्यान त्यांना तुकाराम महादेव यादव याचे अपहरण झालेले नव्हते. तो स्वताच लपून बसला होता. त्याच्या पत्नी, वडील, सासू सासरे यांनी पोलिसांना खोटी माहिती दिली असल्याची माहिती मिळाली.

त्यामुळे आरोपी तुकाराम यादव याचे अपहरण झालेले नसताना त्याची पत्नी सुमन, वडील महादेव, सासरे रामदास व सासु सिंधुबाई यांनी आरोपी महादेव याचेसोबत त्याचे अपहरण झाल्याचा बनाव करुन त्यास लपुन राहण्यास मदत केली व त्याची पत्नी आरोपी सुमन हिने गणेश कवडे, माऊली पठारे, सुनिल दिलीप पठारे, अक्षय भंडारे यांनी पतीचे अपहरण केले,अशी वाढीव हकीगत सांगितली जेणे करुन तपासी अधिकारी यांनी आरोपींना अटक करुन त्याचेवर कठोर कारवाई होवुन त्यांना क्षती पोहचावी व त्याचे नुकसान व्हावे या उद्देसाने खोटी माहीती देवुन वाढीव हकीगतीची फिर्याद दिली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. पुढील तपास स.पो.नि. प्रल्हाद गिते हे करीत आहेत.

## पवनचक्क्यांची कॉपर केबल चोरणारी नगर आणि पारनेरची टोळी पकडली

नगर – जिल्ह्यातील विविध भागांतून पवनचक्क्यांच्या टॉवरवरील कॉपर केबलची चोरी करणाऱ्या नगर आणि पारनेर तालुक्यातील टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. गुन्हे शाखेने या टोळीचा पर्दाफाश करत तिघांना अटक केली असून, त्यांच्या कडून ४ गुन्हे उघडकीस आणत ५ लाख २५ हजार ६०० रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

अतुल विश्वनाथ शिंदे (वय ३५, रा. शहाजापूर, ता. पारनेर), संकेत बाळासाहेब म्हस्के (वय २२, रा. पिंपळगाव कौंडा, ता. नगर), अनिकेत शशिकांत गवळी (वय ३०, रा. शहाजापूर) अशी अटक केलेल्या तिघांची नावे आहेत. शहाजापुर (ता. पारनेर) शिवारातील सुजलान कंपनीच्या टॉवरवरून २० जून ते ११ सप्टेंबर २०२५ दरम्यान अज्ञात चोरट्यांनी कॉपर केबल चोरून नेली होती. याप्रकरणी संतोष भिका लंके (वय ४६, रा. हंगा, ता. पारनेर) यांनी सुपा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता.

जिल्ह्यात कॉपर वायर चोरीच्या घटना वाढल्याने पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार, पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली अंमलदार रमेश गांगर्डे, फुरकान शेख, अतुल लोटके, गणेश लबडे, रिचर्ड गायकवाड, भिमराज खर्से, भाऊसाहेव काळे, अमोल कोतकर, अरूण मोरे तसेच सुपा पोलीस ठाण्याचे मेघराज कोल्हे, योगेश सातपुते यांचे पथक तयार करण्यात आले.



जिल्ह्यात पवनचक्क्यांच्या टॉवरवरील कॉपर केबलची चोरी करणाऱ्या टोळीला मुद्देमालासह पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.


### ५.२५ लाखांचा मुद्देमाल केला हस्तगत, चोरीच्या ४ गुन्ह्यांची झाली उकल

पथकाने रेकॉर्डवरील गुन्हेगारांची माहिती घेत असताना, सदरचा गुन्हा रेकॉर्डवरील गुन्हेगार अतुल विश्वनाथ शिंदे याने केल्याची माहिती पथकाला मिळाली. पथकाने सापळा रचून अतुल शिंदे, संकेत म्हस्के व अनिकेत गवळी यांना सुपा येथून ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी केली असता, त्यांनी सदरचा गुन्हा इतर साथीदारांसह केल्याची कबुली दिली. यामध्ये ऋषीकेश सुनील पवार (रा. पिंपळगाव कौंडा), अरूण शिवाजी गवळी, पप्पु बाबाजी जाधव, प्रवीण सावकार म्हस्के (तिघे, रा. शहाजापुर), श्रीकांत संपत साठे (रा. हंगा, ता. पारनेर) स्वप्नील पवार व अक्षय सकट (पूर्ण नाव व पत्ता माहिती नाही) यांचा समावेश असून ते सर्व पसार झाले आहेत.

पोलिसांनी अटक केलेल्या तिघांकडून एकुण ५ लाख २५ हजार ६०० रूपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी सुपा पोलीस ठाणे हद्दीतील दोन व नगर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील दोन ठिकाणी चोरी केल्याची कबूली दिली आहे. तिघांना पुढील तपासकामी सुपा पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. दरम्यान अतुल शिंदे व अनिकेत गवळी सराईत गुन्हेगार आहेत. अतुल शिंदे विरोधात सुपा व नगर तालुका पोलीस ठाण्यात आठ, तर अनिकेत गवळी विरोधात सुपा व नगर तालुका पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल आहेत.


## नम्रता रजपूत यांचे अल्प आजाराने निधन

नगर – आगरकर मळा, स्टेशन रोड येथील नम्रता विरेंद्र रजपूत (वय ३५) यांचे ६ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर स्टेशन रोड, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे आई, वडील, पती, चुलते, भाऊ, चुलती, १ मुलगी असा परिवार आहे. सुनील काळे यांच्या त्या पुतणी होत.

## हाजी अब्दुल करीम खान यांचे अल्प आजाराने निधन



नगर – आनंदी बाजार येथील रहिवासी हाजी अब्दुल करीम खान (वय ७०) यांचे ३ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांचा दफनविधी जलालशाह बुखारी कब्रस्तान येथे करण्यात आला.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुली, नातवंडे, जावई असा परिवार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## मुकुंदनगर परिसरातून अल्पवयीन मुलीचे अपहरण

नगर – १७ वर्षीय अल्पवयीन मुलीस अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची घटना मुकुंदनगर परिसरात ६ नोव्हेंबर रोजी दुपारी ४.१० ते ५ वाजण्याच्या कालावधीत घडली. मुलीच्या कुटुंबियांना मुलगी घरात नसल्याचे निदर्शनास आल्यावर तिचा मुकुंदनगर परिसर, तिच्या मैत्रिणीकडे, तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला असता ती कोठेही मिळून आली नाही. यावरुन तिचे कोणीतरी अज्ञाताने अपहरण केल्याची खात्री झाली. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अपहृत मुलीच्या पालकांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात इसमाविरुद्ध बी एन एस कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पल्लवी वाघ या करीत आहेत.

## मातंग समाजातर्फे १० नोव्हेंबरला महा मोर्चा

नगर – सकल मातंग समाजाच्या वतीने १० नोव्हेंबरला विविध मागण्यांसाठी अहिल्यानगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर महा मोर्चाचे आयोजन केले आहे. त्या संदर्भात जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांना निवेदन सादर करून माहिती देण्यात आली. यावेळी विजय पठारे, राम वडागळे, सुनील उमाप, अंकुश मोहिते, रंजीत वैरागर, किशोर उमाप, राम काते, अजय त्रिभुवन, विशाल वाघमारे आदी सह कार्यकर्ते उपस्थित होते.



सकल मातंग समाजाच्या वतीने १० नोव्हेंबर रोजी विविध मागण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर महा मोर्चाच्या आयोजन केले आहे.

निवेदनात म्हटले आहे कि, १० नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता कार्यालयावर लहु शक्ती–भिम शक्ती मोर्चा काढण्यात येणार आहे. याबाबत आपणास निवेदन देण्यात येते कि, जिल्हाधिकारी कार्यालयावर खालील मागण्या घेऊन मोर्चा काढण्यात येणार आहे. मातंग समाजाला जाहिर सभा घेऊन जातीवर शिवीगाळ करणाऱ्यावर गुन्हे दाखल करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अनु. जातीचे अ, ब, क, ड व वर्गीकरणाची त्वरीत घोषना करावी, संजर वैरागर हल्ला करणाऱ्यांवर मोकाअंतर्गत गुन्हे दाखल करून कुटुंबास पोलीस संरक्षण दयावे, दलित समाजावर खोटे गुन्हे मागे घेण्यात यावे.

हा पायी मोर्चाचा मार्ग हा क्रांतीगुरु लहुजी वस्ताद चौक ते पत्रकार चौक, तारकपुर बसस्थानक ते डिएसपी चौक ते महानगरपालिका ते जिल्हाधिकारी कार्यालयवर मोर्चा येणार आहे. याबाबत पोलीस अधिक्षक, अहिल्यानगर, पोलीस निरीक्षक, तोफखाना पोलीस स्टेशन यांनाही माहितीसाठी निवेदन देण्यात आलेले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### जिन्स घालण्याचे तोटे

फॅशन ही अशी गोष्ट आहे जी सर्वांनाच फॉलो करायची असते. कपडे असोत, मेकअप असोत, केशरचना असोत किंवा इतर काहीही असो, आपण अनेक अभिनेते आणि अभिनेत्रींकडे पाहतो आणि त्यांची कॉपी करतो. आजकाल, बाजारात आपल्याला अधिक स्टायलिश जीन्स दिसत आहेत, आजच्या काळात तरुण असो की प्रौढ असो सर्वच जीन्सचा वापर करतात. मात्र जीन्स घालण्याचे काही तोटे आहे. जीन्स रंगविण्यासाठी अनेक रसायनांचा वापर केला जातो. त्यामुळे दुष्परिणाम होऊ शकतात. जीन्स रंगविण्यासाठी अनेकदा कृत्रिम रंगांचा वापर केला जातो. म्हणूनच कपड्यांमध्ये वापरले जाणारे रंग त्वचेसाठी हानिकारक असू शकतात. त्यामुळे ॲलर्जी देखील होऊ शकते. जीन्स जाड असल्याने त्या पुरेसा सूर्यप्रकाश आणि हवा त्यांच्यापर्यंत पोहोचू देत नाहीत, ज्यामुळे त्वचेचे संसर्ग होऊ शकतात.

## पाककला

### दध्योजन (दहीभात)

**साहित्य :** तांदूळ एक वाटी, दूध: एक वाटी, दही: दोन वाट्या, शेंदेलोण किंवा मीठ: एक चमचा / चवीनुसार चणाडाळ:एक चमचा, उडीदडाळ: एक चमचा, मोहरी: अर्धा चमचा, जिरे: अर्धा चमचा, मिरे: अर्धा चमचा, आलं: एक इंच, बारीक ठेचून, हिरव्या मिरच्या: दोन, लांब चिरून, वाळलेल्या लाल मिरच्या: दोन, तुकडे करून, कढीपत्ता: एक काडी, हिंग: पाव चमचा डाळिंब दाणे: दोन-तीन चमचे (ऐच्छिक) कोथिंबीर: थोडीशी, बारीक चिरून

**कृती :** तांदूळ स्वच्छ धुवून, अडीच वाट्या पाणी घालून मऊ शिजवून घ्या. गरम असतानाच किंचित घोटून घ्या. दाणे किंचित मोडा. त्यात एक वाटी गरम दूध घालून हलवून ठेवा. थंड झाल्यावर दोन वाट्या दही घाला. नीट एकत्र करून घ्या. एका भांड्यात काढून ठेवा. फोडणीच्या कढईत एक-दीड चमचा तेल गरम करा. त्यात चणाडाळ, उडीदडाळ, मोहरी, जिरे व मिरे क्रमाने घाला. एका मिनिटाने आलं घाला. किंचित परतून हिरवी मिरची, लाल मिरची व कढीपत्ता घाला. परतल्यावर गॅस बंद करून हिंग घाला. फोडणी थंड झाल्यावर दहिभातावर घाला. शेंदेलोण घालून नीट हलवून एकत्र करा. आवडत असल्यास कोथिंबीर व डाळिंब दाणे घालून वाढा.

## वास्तू

### हे ठरू शकते दुर्दैवाचे कारण

जर तुम्ही रात्री बाथरूमचा दरवाजा उघडा ठेवला तर दरवाजा उघडा असल्याने बाथरूममध्ये असलेली ओलावा, वास आणि कोणत्याही प्रकारची नकारात्मक ऊर्जा संपूर्ण घरात पसरू लागते. ही अशी नकारात्मक ऊर्जा आहे जी तुमच्या घरात वास्तुदोष देखील निर्माण करू शकते. अशा परिस्थितीत, तुम्हाला रात्री बाथरूमचा दरवाजा नेहमी बंद करण्याचा सल्ला दिला जातो.

## सौंदर्य

तुमचा चेहरा कोमट पाण्याने धुवा, जेणेकरून संपूर्ण दिवसाची घाण आणि तेल बाहेर येईल. सौम्य फेस वॉशने त्वचा स्वच्छ करा, सल्फेट फ्री फेस वॉश वापरावे.

## सल्ला

साडी धुता तेव्हा थोड्या प्रमाणात सौम्य डिटर्जंट वापरा याने साडीला फिकट होण्यापासून रोखली जाईल. आणि साडीची चमक कायम राहिल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. ८ नोव्हेंबर २०२५

**संकष्ट चतुर्थी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, कार्तिक कृष्णपक्ष, मृग २२।०३, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३५ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल.

**वृषभ :** खाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट आपल्यासाठी आनंदाची ठरेल. धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** कला क्षेत्रात यश मिळण्याची शक्यता आहे. आपणास नवे वाहन मिळण्याची शक्यता आहे. मानसन्मानात वाढ होईल.

**कर्क :** एखाद्या जीवलगाबरोबर भागीदारीसाठी वैयक्तिक पातळीवर संबंध वाढविण्याचा प्रयत्न कराल. यशस्वी व्हाल.

**सिंह :** आपल्या जुन्या लोकांबरोबर किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे या वेळी आपल्यासाठी फलदायी ठरेल.

**कन्या :** कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील.

**तूळ :** इतर लोकांना आपल्या स्वतःच्या आवश्यकता व इच्छा सांगण्यासाठी ही उत्तम वेळ आहे.

**वृश्चिक :** आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल. आरोग्याची काळजी घ्या. व्यस्त राहाल.

**धनु :** मानसिक स्थिती आल्हाददायक राहील व वरिष्ठांबरोबर संपर्कात आल्याने प्रसन्न वातावरण राहील. संततीसौख्य लाभेल.

**मकर :** आपला जोडीदार आपणास भावनात्मक पाठबळ देईल. मित्रांमध्ये होणारे वाद आपल्या संबंधासाठी वाईट ठरतील.


**कुंभ :** आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मिळण्याचे कारण ठरतील. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समर्थन मिळेल.

**मीन :** आज आपणास कठोर श्रम करावे लागतील. काही निष्कारण चिंतांमुळे आपली व्यग्रता वाढेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२९८

सौ.शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द :-** १) विधानसभा किंवा विधान परिषदेचा सभासद ५) रागाचा अतिरेक; रागाचा आवेश ७) आपणास माहीत नाही किंवा आपला काही संबंध नाही असे दाखविणे ८) ओझे वाहणारा पूर्वीचा एक गावकामगार ११) अतिशय वेगात १२) शरीराचा भाग १३) एक दिवंगत भारतीय क्रिकेटपटू ज्यांच्या नावाने भारतात क्रिकेट स्पर्धा चालतात १५) एक मूल्यवान लाकूड व त्याचे झाड १७) हिंदू वर्षाचा अकरावा महिना १९) पुरून उरेल इतके (संपत्ती वगैरे) २२) माणसांतील श्रेष्ठ २३) पांढरा शुभ्र

**उभे शब्द :-** १) गगन; नभ; अंबर २) निषिद्ध; प्रतिबंध ३) अनेक जनावरे ज्याला बांधतात ती लांबलचक एकच दोरी ४) रड रडगाणे ५) मध्ये खंडित न होता एकसारखी पडणारी धार ६) मातीचे पसरट व उथळ असे एक पात्र ९) लंकेचा दहातोंडी राजा १०) महादेवाचे भक्त ११) संसाररूपी समुद्र १२) समान नसलेले १४) चेतना; प्राणी; जंतू; साप १६) डोंगरी किल्ला १८) गृह; निवासस्थान; गेह २०) वास; राहणे २१) एक धान्य; यव; सातू

**शब्दगंध क्र. ७२९७ चे उत्तर**



**फिल्मीचक्कर क्र. १२१० चे उत्तर**



# मुलांचे विश्व

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** विचार करण्याची पद्धत सुपाप्रमाणे असावी, दोष तेवढे काढून टाकायचे आणि गुण तेवढे शिल्लक ठेवायचे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### रील्स पासून दूर राहिल्याने खरोखर मेंदू रीसेट होतो का?

डोपामिन डिटॉक्स ही एक लोकप्रिय संकल्पना आहे, जी मुख्यतः सोशल मीडिया, रील्स, गेमिंग आणि इतर उत्तेजक क्रियाकलापांपासून दूर राहून मेंदूच्या रिवॉर्ड सिस्टमला रीसेट करण्याचा प्रयत्न करते. ही कल्पना कॅलिफोर्नियातील मानसोपचारतज्ज्ञ डॉ. कॅमरॉन सेपाह यांनी २०१९ मध्ये मांडली होती, ज्यात डोपामिन नावाच्या न्यूरोट्रान्समिटरशी संबंधित आहे. डोपामिन हे मेंदूत आनंद, प्रेरणा आणि शिकण्याशी जोडलेले रसायन आहे, जे आपल्याला क्रियाकलापांमध्ये रस घेण्यास मदत करते. डिटॉक्सच्या अंतर्गत, व्यक्ती काही काळ (उदा. एक दिवस ते काही आठवडे) या उत्तेजक गोष्टींपासून दूर राहते, जसे की मोबाईल स्क्रोलिंग, टीव्ही पाहणे किंवा जंक फूड खाणे, आणि त्याऐवजी ध्यान, व्यायाम किंवा वाचन यासारख्या साध्या क्रियाकलापांवर लक्ष केंद्रित करते.

वैज्ञानिकदृष्ट्या बोलायचे तर, डोपामिन डिटॉक्स ही संकल्पना पूर्णपणे अचूक नाही आणि ती मेंदूला खरोखर रीसेट करत नाही. डोपामिन हे शरीरात नैसर्गिकरित्या तयार होणारे रसायन आहे, जे जीवनासाठी आवश्यक आहे, ते फक्त आनंदच नव्हे तर प्रेरणा, लक्ष आणि शिकण्यासाठीही महत्त्वाचे आहे. तुम्ही डोपामिनपासून डिटॉक्स करू शकत नाही, कारण ते थांबवले तरी तुम्ही जगू शकत नाही! ही कल्पना डोपामिनच्या कार्याची चुकीची समजूत आहे. सोशल मीडिया किंवा रील्ससारख्या गोष्टींमुळे डोपामिनचे तात्काळ उत्तेजन होते, ज्यामुळे मेंदूची रिवॉर्ड सिस्टम ओव्हरस्टिम्युलेट होऊ शकते आणि दीर्घकाळात फोकस कमी होऊ शकतो. पण या क्रियाकलापांपासून दूर राहिल्याने डोपामिनचे स्तर रीसेट होत नाहीत; त्याऐवजी, ते सवयी आणि वर्तन बदलण्यास मदत करू शकते.

वैज्ञानिक पुरावा सांगतो की, स्क्रीन टाइम कमी केल्याने मानसिक आरोग्य सुधारू शकते उदाहरणार्थ, तणाव कमी होणे, फोकस वाढणे आणि साध्या क्रियाकलापांमध्ये आनंद मिळणे. काही अभ्यासांनुसार, अशा ब्रेकमुळे आवेगपूर्ण वर्तन कमी होते आणि भावनिक नियंत्रण सुधारते. तथापि, हे डोपामिन रीसेट नाही, तर एक प्रकारचे डिजिटल डिटॉक्स किंवा माइंडफुलनेसे प्रॅक्टिस आहे. मेंदूच्या न्यूरल पाथवे बदलण्यासाठी ९० दिवसांपर्यंत वेळ लागू शकतो, पण हे प्रत्येक व्यक्तीवर अवलंबून असते.

रील्स आणि मोबाईलपासून दूर राहिल्याने लक्ष विचलित कमी होतं, ज्यामुळे कामावर लक्ष केंद्रित करणे सोपे होते. काही लोकांना यामुळे सर्जनशीलता वाढल्याचा अनुभव येतो. तणाव, चिंता आणि ओव्हरस्टिम्युलेशन कमी होऊ शकते. साध्या गोष्टींमध्ये (जसे की निसर्गात फिरणे) आनंद मिळू लागतो. हे आवेग कमी करून दीर्घकालीन उद्दिष्टांवर फोकस करण्यास मदत करते.

उदाहरणार्थ, सोशल मीडिया व्यसन कमी होऊ शकते. काही संशोधन दाखवतात की, डिजिटल ब्रेक घेतल्याने मेंदूची रिवॉर्ड सिस्टम रिकॅलिब्रेट होते, ज्यामुळे प्रेरणा सुधारते.

ही कल्पना फॅड म्हणून ओळखली जाते, कारण ती डोपामिनच्या भूमिकेची अतिसरलीकरण करते. डोपामिन डिटॉक्स करणे शक्य नाही, आणि ते रीसेट करत नाही. काही लोक हे इतके कठोरपणे करतात की, ते अनुपयुक्त ठरते उदाहरणार्थ, बोलणे किंवा सामाजिक संबंध टाळणे, ज्यामुळे एकटेपणा वाढू शकतो.

काही दिवसांचा ब्रेक फायद्याचा असू शकतो, पण तो कायम राहत नाही. सवयी बदलण्यासाठी सतत प्रयत्न आवश्यक आहेत. प्रत्येकाच्या मेंदू आणि जीवनशैलीनुसार परिणाम वेगळे असतात. ज्यांना व्यसन आहे त्यांना व्यावसायिक मदत घ्यावी लागते. शेवटी, डोपामिन डिटॉक्स ही एक उपयुक्त प्रॅक्टिस असू शकते जर ती डिजिटल ब्रेक म्हणून घेतली जाईल, पण ती जादुई रीसेट नाही. रील्स आणि मोबाईलपासून दूर राहणे फायद्याचे आहे, पण ते विज्ञानाच्या आधारावर डोपामिन नियंत्रणासाठी नव्हे तर सवयी सुधारण्यासाठी करा. जर तुम्हाला व्यसन वाटत असेल, तर डॉक्टर किंवा थेरपिस्टशी बोलणे चांगले.

### धूर्त व्यक्तीची मैत्री

एका नदीत एक मगर राहत होता. तो खूप भोळी होता. त्याच्यासोबत त्याचा एक मित्र होता, जो खूप हुशार होता. दोन्ही मगरी नदीत राहत होत्या आणि वेगवेगळी शिकार करत होत्या आणि खात होत्या.


एके दिवशी, एक लाकूडतोडा नदीकाठी झाडे तोडत होता. एक मगर त्याच्या जवळ आली तेव्हा तो घाबरला. पण मगरी लाकूडतोड्याला म्हणाली, हे झाड तोडू नकोस. जेव्हा मला वाटेल तेव्हा मी या झाडाच्या सावलीत बसतो. हे ऐकून लाकूडतोडा म्हणाला, पण हे माझे काम आहे. मी लाकूड विकून पैसे कमवतो. मगरी म्हणाली, नदीच्या पलीकडे अनेक झाडे आहे. त्यांच्याखाली खूप लाकूड आहे. मी तुला ते लाकूड आणून देईन. पण तू ही झाडे तोडणार नाहीस असे वचन दिले पाहिजे.

लाकूडतोडा सहमत झाला. मगरी दुसऱ्या दिवशी परत येण्याचे आश्वासन देऊन निघून गेला. लाकूडतोडा आला तेव्हा त्याला लाकडाचा ढीग सापडला. थोड्याच वेळात मगरी येते. लाकूडतोडा त्याचे आभार मानतो. त्याला जास्त प्रयत्न न करता लाकूड मिळाले होते.

आता, दररोज, मगर लाकूडतोड्याकडे लाकूड आणू लागतो. हळूहळू, मगर आणि लाकूडतोडा मित्र बनतात. ते बोलत राहतात. एके दिवशी, मगर लाकूडतोड्याला त्याच्या मित्राशी ओळख करून देतो. जेव्हा दुसरा मगर लाकूडतोड्याला पाहतो तेव्हा त्याच्या तोंडाला पाणी सुटते. कारण भीतीने कोणीही माणूस तिथे येत नाही. पण हा लाकूडतोडा मगरीच्या मैत्रीमुळे येतो.

एके दिवशी, लाकूडतोडा तिथून निघून जातो तेव्हा. दुसऱ्या मगरीने पहिल्याला म्हटले, तो तुमचा चांगला मित्र आहे. तुम्ही खूप कष्ट करता आणि तो आनंदाने लाकूड घेऊन निघून जातो. हे ऐकून मगरी म्हणाली, त्याने मला वचन दिले आहे की तो ही झाडे तोडणार नाही. त्या बदल्यात मी त्याला काही लाकूड आणून देईन. हे ऐकून दुसरा मगर हसायला लागला. तो म्हणाला, मित्रा, तू खूप भोळा आहे. तू या माणसांना ओळखत नाहीस. ज्या दिवशी तू त्याला लाकूड आणणार नाहीस, तो ते तोडून टाकेल. पहिली मगर म्हणाली, मला सुरुवातीला असं वाटायचं, पण आता तो माझा मित्र आहे. तो असं करणार नाही.

(क्रमश:)



## जीवन का अमृत (भाग १)

### दुःख-दर्द

जैसे बड़ी-बड़ी कड़ाहियों में तेल गर्म किया जाए और जीवों को उसमें डाल दिया जाए । अगर फर्श पर चलें, तो ऐसा लगता है कि हज़ारों, लाखों बिच्छू डंक मारते हों । सर्दी इतनी अधिक होती है कि मेरु के समान ऊँचे पहाड़ भी जमने लगते हैं- मेरु पहाड़ हिमालय से हज़ारों गुणा बड़ा है । जब जीव नरक में होता है, तो उसे इतनी अधिक प्यास लगती है कि यदि वह सारा सागर भी पी जाए, तब भी उसकी प्यास न बुझे, लेकिन पीने को पानी की एक बूंद भी नहीं मिलती । यह भी कहा गया है कि भूख इतनी अधिक लगती है, जैसे कि वह सारी धरती का अनाज खा जाए, तो भी भूख न मिटे, लेकिन खाने को एक दाना भी नहीं मिलता । यह हालत जीव की नरक में बताई गई है । अपने-अपने कर्मों के अनुसार जीव को भुगतान करना है और उसी गर्म हवा की, जो जीवन दुःख-दर्द से भरा हुआ है, उसकी बातचीत गुरु अर्जनदेव जी महाराज यहाँ कर रहे हैं ।

वे दुःख-दर्द जो हमें इस जन्म में मिलते हैं, वे दुःख-दर्द जो हम नरकों में पाते हैं, वे दुःख-दर्द जो हमारी जिंदगी का हिस्सा बन चुके हैं, वे दुःख-दर्द हमें क्यों मिलते हैं ? यह सवाल बहुत बार किया गया है कि यदि परमात्मा प्रेम का महासागर है, परमात्मा खुशियों का महासागर है, तो फिर हम जीव, जो उसके अपने बच्चे हैं, उन्हें दुःख-दर्द क्यों सताते हैं ? जब हम महापुरुषों की वाणियों को पढ़ते हैं, तो बार-बार हमें यही समझाया जाता है कि नीचे के तीन मंडल- पिंड, अंड और ब्रह्मंड हैं, यहाँ पर कर्मों का विधान लागू होता है । हम अपने कर्मों के अनुसार ही इन मंडलों में रहते हैं ।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### परम ज्ञान

आत्मा मूलत: ज्ञानस्वरूप, पवित्र स्वरूप, शान्त स्वरूप, प्रेम स्वरूप, सुख स्वरूप, आनन्द स्वरूप, शक्ति स्वरूप और दिव्य गुणों से युक्त है और परमात्मा इन सभी गुणों व शक्तियों का स्रोत अथवा सागर है । जब हम स्वयं को आत्मा समझकर परम त्मा को याद करने लगते हैं, तो परमात्मा के इन सब गुणों व शक्तियों का संचार आत्मा में होने लगता है और आत्मा स्वयं में भरपूरता का अनुभव करने लगती है। इस अवस्था में एकाग्र होने का अभ्यास बढ़ाते जाना है । पहले एक मिनट फिर दो, तीन करके, पाँच-दस मिनट तक एकाग्र होने से इन गुणों एवं शक्तियों के प्रकम्पन आत्मा से निकलकर शरीर के माध्यम से बाहर फैलने लगते हैं और प्रकृति सहित सभी को इसका अनुभव होने लगता है ।

वर्तमान समय स्वयं को देह समझकर किये जाने वाले विचारों का बहुत बुरा प्रभाव, प्रकृति सहित जीव-जन्तु, पशु-पंछी, प्राणी, वृक्ष-वनस्पतियों पर हो रहा है । परन्तु राजयोग के अभ्यास से आत्मा के स्वरूप में रहकर विचार करने से प्रकृति सहित सर्व पर बहुत अच्छा प्रभाव पड़ता है क्योंकि आत्मिक स्थिति में विकार रहित विचार चलते हैं ।

राजयोग में आत्मा परमात्म-शक्तियों की अनुभूति करती है, उस समय आत्मा के अन्दर से निकलने वाले प्रकंपन द्वारा वायुमण्डल बदल जाता है । ऐसी एकाग्र अवस्था में स्थित रहकर कितनी भी दूर वाले व्यक्ति, वस्तु या वनस्पति प्रति भी अगर हम श्रेष्ठ संकल्प करते हैं तब उस दूर वाले व्यक्ति, वस्तु या वनस्पति के हर जिन्स को या उनके अन्दर की ऊर्जा को हमारे श्रेष्ठ प्रकम्पन प्रभावित करते हैं या उसे क्रियाशील करते हैं । यही प्रयोग हमें जमीन और वनस्पतियों को निरोगी और शक्तिशाली बनाने के लिए करना है ।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

जुन्या जमान्यातला १ रुपया म्हणजे आजचे १०० रुपये.
तसेच, आमचे तेव्हाचे १०वी चे ५६ टक्के म्हणजे आत्ताचे
९६ टक्के समजावेत आणि आमचा आदर कायम ठेवावा.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* ऑस्ट्रेलियाची नाईन कंपनी जॅकल्स् क्रिकने अम्बेसेडर म्हणून कोणाची नियुक्ती केली आहे? - मिनालिका राज

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# काय खावे?

स्नेहनासाठी तीळतेल वापरावे. गुलाब, चंदन, अगरू, त्रिफळा या द्रव्यांनीयुक्त उटण्याचा अंघोळीसाठी वापर करावा. यामुळे शरीराला लावलेले तेल निघून जाईल व सुगंधी वासामुळे शरीर व मन प्रसन्न राहील. अंघोळीसाठी गरम पाण्याचा वापर करावा. थंडीपासून बचाव करण्यासाठी स्वेटर, पायमोजे, हातमोजे, कानटोपी, शाल, स्कार्फ यांचा वापर करावा. नेहमी उबदार कपडे घालावेत. सकाळी कोवळे ऊन पडल्यानंतर थोडा वेळ उन्हाम ध्ये बसावे. यामुळे शरीराला 'ड' जीवनसत्त्व मिळते व थंडीपासून संरक्षण होते. या ऋतूमध्ये दिवसा झोपू नये, तसेच जागरण करू नये.

### आयुर्वेद

**आयुर्वेदिक उपचार :** या ऋतूत आरोग्य चांगले राहते, परंतु अति थंडीमुळे शरीरामध्ये कफसंचय होऊन सर्दी, खोकला झाल्यावर सितोपलादी चूर्ण, वासावलेह, तालिसादी चूर्ण अशा प्रकारची औषधे घ्यावीत. चहाऐवजी आयुर्वेदिक चहा (काढा) घ्यावा. गूळ, आले, तुळस, गवती चहा यांचा काढा घ्यावा. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढून सर्दी-खोकला, ताप असे आजार उद्भवत नाही. पंचकर्म उपचारां मध्ये स्नेहन, स्वेदन ही पूर्व कर्मे तर शिरोधारा, नस्य ही कर्मे करणे लाभदायक ठरते. शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी च्यवनप्राश व शतावरी कल्प नियमित घ्यावा.

**६) शिशिर ऋतुचर्या :**

**ओंब्या गव्हाच्या बहु मोददायी ।**
**हुर्डा तसा शाळुहि शक्तीदायी ।।**
**काढावया घेऊनिया विळ्यासी ।**
**बाला तशी ये शिशिरी वनासी ।।**

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# अतिथी व्हेजच्या दालनाने महाराष्ट्रातील खाद्य संस्कृतीत मानाचे स्थान मिळवले

## आ.संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; अतिथी व्हेजच्या दालनाचा शहरात शुभारंभ



सावेडीमधील डौले हॉस्पीटलसमोर नव्याने सुरू करण्यात आलेल्या अतिथी व्हेज या दालनाचे उद्घाटन करताना आमदार संग्राम जगताप. समवेत नरेंद्र फिरोदिया व एपी क्रिस्टलचे आशिष पोखरणा आदी.

नगर – महाराष्ट्रातील खाद्य संस्कृतीत अतिथी व्हेजच्या दालनाने मानाचे स्थान मिळवले आहे. अतिथी व्हेजचे दालन आपल्या शहरात सुरू होणे, ही नगरकरांसाठी आनंदाची घटना आहे. स्वच्छतेची दक्षता घेत तयार करण्यात आलेले शुध्द शाकाहारी, रूचकर, स्वादिष्ट आणि उच्च प्रतीचे दर्जेदार पदार्थ येथे तृप्तीची ढेकर द्यायला लावतील, असा विश्वास आ.संग्राम जगताप यांनी व्यक्त केला.

सावेडीमधील डौले हॉस्पीटलसमोर नव्याने सुरू करण्यात आलेल्या अतिथी व्हेज या दालनाचे उद्घाटन करताना ते बोलत होते. कार्यक्रमास उद्योजक नरेंद्र फिरोदिया व एपी क्रिस्टलचे आशिष पोखरणा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रविण शेट्टी यांनी स्वागत करताना अतिथी व्हेजच्या महाराष्ट्रभर २६ शाखा असून दुबई येथेही शाखा असल्याचे सांगितले. नगरकरांची अभिरूची लक्षात घेऊन शुध्द शाकाहारी मंडळींसाठी हे नूतन दालन सुरू करण्यात आले असून सकाळी ७ ते रात्री ११ या वेळेत खुले राहिल, असे ते म्हणाले.

नरेंद्र फिरोदिया यांनी शुध्द शाकाहारी मंडळींना येथे उत्तम दर्जाचे आणि उत्तम प्रतीचे सात्विक खाद्य पदार्थ मिळतील, असा विश्वास व्यक्त केला. आशिष पोखरणा यांनी स्वच्छता, टापटिप, तत्पर विनम्र सेवा हे अतिथी व्हेजचे खास वैशिष्ट्य राहिल. नगरच्या खाद्य संस्कृतीत अतिथी व्हेजचे हे दालन अग्रेसर राहिल, असे सांगितले.

प्रविण चोरडिया व किरण शिंगी यांनी आभार मानले. कार्यक्रमास आनंदीलाल शिंगी, भावेश चोरडिया, अमोल शिंगी, कुणाल शिंगी, भगवान फुलसौंदर, गणेश भोसले, महेंद्र गंधे, प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, विपुल शेटीया, अविनाश घुले, सचिन बारस्कर उपस्थित होते.

# गुरु निष्ठा, समर्पण, सद्गुणांचा आनंदधाममध्ये महोत्सव



नगर – आनंदधाम, हे स्थान फक्त जैन धर्मियांसाठीच नव्हे तर सम्पूर्ण भारत देशातील आनंद बाबांच्या श्रध्दाळू भक्तांकरिता श्रध्दा – भक्ति चे चैतन्य स्थान आहे. राष्ट्रसंत आचार्यसम्राट श्री आनंदऋषिजी महाराज यांची ही कर्मभूमी। १९ व्या शतकात आचार्यश्रींनी सर्वसामान्य लोकांच्या उध्दारासाठी केलेले मानवतेचे कार्य आज दीपस्तंभाप्रमाणे पथदर्शक बनले आहे. अशा महापुरुषांच्या सेवेत सतत ३० वर्षे राहून दिव्य उर्जा प्राप्त करण्याचे भाग्य आचार्यश्रींजीं चे ज्येष्ठ सुशिष्य महाराष्ट्र प्रवर्तक मौनसाधक श्री कुंदनऋषिजी म. सा. यांना लाभले. २८ व्या वर्षी गुरु चरणी समर्पित होऊन त्यांनी गुरुची त्यांच्या अंतिम क्षणापर्यंत निःस्वार्थ, निरपेक्ष भावनेने सेवा केली. तप, त्याग, संयम, ज्ञान, ध्यान ची आराधना केली.

यथा नाम तथा गुण रुप त्यांचे जीवन कुंदन समान बनले. गुरु छायेत राहून श्री कुंदनऋषिजी महाराजांनी आनंद गुरुंच्या दिव्य गुणांना आपल्या जीवनात उतरविले. सतत प्रसन्न मुद्रा, मधुर वाणी, सहज – सरळ शालीन, भद्र स्वभाव इत्यादी अनेक अलौकिक गुण छटा त्यांच्या जीवनात दिसून येतात. गरीब असो वा श्रीमंत, लहान असो वा थोर, सामान्य असो वा असामान्य, सर्वांबरोबर त्यांचा आपुलकीचा व्यवहार ही श्रध्दाळू भक्तांकरिता मोठी पर्वणीच आहे.

११ नोव्हेंबर रोजी या महान विभूतीचा ९२ वा जन्मोत्सव साजरा करण्याचे सद् भाग्य नगरवासीयांना लाभले आहे. पंच दिवसीय धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून गुरुदेवांना वाढदिवसाच्या शुभेच्छा व श्रध्दा – भक्ति ची सुंदर भेट श्री चरणी अर्पण करण्यात येणार आहे. या श्रृंखलेत ७ नोव्हेंबर रोजी स्वस्तिक मंगल जाप झाला.

८ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते १० या वेळेत बचाओ.. बचाओ, एक ही बच पायेगा.. कार्यक्रम होणार आहे.

९ नोव्हेंबरला सकाळी ६:३० ते ९:३० पर्यंत ध्यानयोगी आचार्य श्री शिवमुनिजी म सा यांचे आत्मध्यान धर्मयज्ञ होणार आहे.

१० नोव्हेंबर व ११ नोव्हेंबर रोजी गुरु गुणानुवाद सभा होणार आहे.

सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहून गुरुदेवांच्या उत्कृष्ट तप, त्याग, संयमी जीवनाचे अनुमोदन करावे, असे आवाहन श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ व श्री तिलेकरत्न स्था. जैन धार्मिक परीक्षा बोर्ड यांच्या वतीने करण्यात आले आहे.



जिल्हास्तरीय 'किल्ले बनवा' स्पर्धेत अवनीश वल्लाल याला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले.

# जिल्हास्तरीय 'किल्ले बनवा' स्पर्धेत अवनीश वल्लाल याला प्रथम क्रमांक

नगर – स्नेहबंध सोशल फाउंडेशनच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय किल्ले बनवा स्पर्धेत जिल्ह्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक किल्ल्यांची आकर्षक मांडणी करून सहभाग नोंदविला. या स्पर्धेत अवनीश वल्लाल याने उत्कृष्ट सादरीकरण करीत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. पारितोषिक वितरण समारंभात अहिल्यानगर छावणी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी, भिंगार पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर, स्नेहबंध सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, तसेच श्री रोकडेश्वर हनुमान ट्रस्टचे अध्यक्ष नंदकुमार झंवर यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक वारशाचे जतन आणि आपल्या संस्कृतीविषयी अभिमान जागविण्याचा संदेश या माध्यमातून दिला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन स्नेहबंध सोशल फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी केले, तर आयोजक मंडळाने सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले.अवनीश हा शिल्पकार बालाजी वल्लाल यांचा मुलगा आहे.

# धकाधकीच्या जीवनातही शारीरिक तंदुरुस्ती आवश्यक

## सीईओ पल्लवी विजयवंशी यांचे प्रतिपादन; नगर तालुकास्तरीय शासकीय अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या क्रीडा स्पर्धांना भिंगार येथे सुरुवात



छावनी परिषदेच्या पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेच्या मैदानावर तालुकास्तरीय शासकीय क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते यांच्या मार्गदर्शनाखाली झाले.

भिंगार – शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपल्या धकाधकीच्या कामकाजातून थोडा वेळ काढून शारीरिक तंदुरुस्तीसाठी क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन छावनी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. पल्लवी विजयवंशी यांनी केले. त्या अहिल्यानगर तालुकास्तरीय शासकीय अधिकारी–कर्मचारी क्रीडा स्पर्धा उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक वंदे मातरम गीताने करण्यात आली. या प्रसंगी छावनी परिषदेचे मनोनीत सदस्य वसंत राठोड, विस्तार अधिकारी रविंद्र कापरे, शिक्षिका मंदा माने, निर्मला साठे, केंद्रप्रमुख बाबा गोसावी, अंबादास गारूडकर, भगवान बोरूडे, तसेच मुख्याध्यापक संजय शिंदे आदी उपस्थित होते.

या वर्षीच्या तालुकास्तरीय शासकीय क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन ७ नोव्हेंबर रोजी छावनी परिषदेच्या पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेच्या मैदानावर गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते यांच्या मार्गदर्शनाखाली सुरुवात झाली.

सीईओ विजयवंशी म्हणाल्या, शासकीय कर्मचाऱ्यांना कामाच्या ताणतणावामुळे अनेकदा शारीरिक व्याधींना सामोरे जावे लागते. त्यामुळे कार्यालयीन कामकाजात पूर्ण क्षमतेने कार्यरत राहण्यासाठी नियमित शारीरिक व्यायाम, खेळ आणि क्रीडा उपक्रमात सहभाग घेणे अत्यावश्यक आहे. स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी अधिकारी–कर्मचाऱ्यांचा सहभाग दिसून आला. विविध विभागांतील संघांनी सहभाग घेतला. स्पर्धांमध्ये गोळाफेक, भालाफेक, लांबउडी, धावणे, व्हॉलीबॉल, खो–खो, थाळी फेक, बॅडमिंटन, रिले स्पर्धा अशा विविध क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे.

# राज्यस्तरीय शालेय मॉडर्न पेंटाथलॉन स्पर्धेला अहिल्यानगरात प्रारंभ

## वाडियापार्क क्रीडांगणात महाराष्ट्रातील खेळाडूंची हजेरी





वाडियापार्क जिल्हा क्रीडा संकुल येथे ६ नोव्हेंबर रोजी राज्यस्तरीय शालेय मॉर्डन पेंटाथलॉन क्रीडा स्पर्धेला उत्साहात प्रारंभ झाला.

नगर – अहिल्यानगरातील वाडियापार्क जिल्हा क्रीडा संकुल येथे ६ नोव्हेंबर रोजी राज्यस्तरीय शालेय मॉर्डन पेंटाथलॉन क्रीडा स्पर्धेला उत्साहात प्रारंभ झाला. क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद अहिल्यानगर, मॉर्डन पेंटाथलॉन असोसिएशन ऑफ महाराष्ट्र राज्य संघटना आणि मॉर्डन पेंटाथलॉन असोसिएशन ऑफ अहिल्यानगर जिल्हा संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेला राज्यभरातून विविध जिल्ह्यांतील २७० खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे.

१७ वर्ष वयोगटातील मुला–मुलींच्या गटातील स्पर्धांचे उद्घाटन जलतरण प्रशिक्षक शंकर मादगुंडी यांच्या हस्ते पार पडले. या वेळी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, सुनील पूर्णपात्रे, सत्यवान जाधव, प्रवीण मोरे, हर्षद इनामदार, प्रवीण कोंढावळे, विशाल गर्जे, संतोष वाबळे, प्रियंका खिंडरे, बालाजी केंद्रे, संघटना सचिव विवेक सूर्यवंशी, सारिका ललित गांधी, राजेंद्र कोतकर, शैलेश गवळी, संजय साठे, रावसाहेब बाबर, नंदकुमार शितोळे, अविनाश काळे यांच्यासह खेळाडू, पालक, प्रशिक्षक उपस्थित होते.

जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे म्हणाले की, मॉर्डन पेंटाथलॉन ही स्पर्धा केवळ क्रीडा कौशल्याची नव्हे तर शारीरिक व मानसिक समतोल राखण्याची खरी परीक्षा आहे. आजच्या युगात तरुण पिढीने मोबाईलपासून दूर राहून अशा खेळांत सहभागी व्हावे, हेच या स्पर्धेचे मुख्य उद्दिष्ट आहे. धावणे, पोहणे आणि पुन्हा धावणे या संयोजनातून खेळाडूची खरी स्टॅमिना, सहनशक्ती आणि जिद्द उलगडते. राज्यातील सर्व खेळाडू या स्पर्धेतील आत्मविश्वास घेऊन राष्ट्रीय पातळीवर चमकदार कामगिरी करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या स्पर्धेत खेळाडूंनी अतिशय कौशल्याने आपली कामगिरी सादर केली. स्पर्धेच्या नियमांनुसार खेळाडूंना प्रारंभी १२०० मीटर धावणे, त्यानंतर १०० मीटर जलतरण, व पुन्हा १२०० मीटर धावणे असे तीन टप्पे पार करावे लागले. शारीरिक व मानसिक क्षमतेचा कस लावणाऱ्या या पेंटाथलॉन स्पर्धेत सहभागी खेळाडूंनी प्रचंड चिकाटी व जिद्दीचे प्रदर्शन केले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी कैलास नगरेकर, गोपाळ मोघे, साहिल सूर्यवंशी, आफताब सय्यद, विजय फुलमाली, प्रसाद पाटोळे परिश्रम घेत आहेत. शुक्रवारी (दि. ७ नोव्हेंबर) सकाळी १९ वर्ष वयोगटातील मुला व मुलींच्या स्पर्धा पार पडणार आहेत.



राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघाचे अहिल्यानगर येथे सराव शिबिरामध्ये सहभागी झालेले खेळाडू.

# राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाच्या सराव शिबिरास अहिल्यानगर येथे सुरूवात

नगर – बरेली (उत्तर प्रदेश) ११ ते १५ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी १७ वर्षांखालील मुले आणि मुली महाराष्ट्राच्या संघाचे सराव शिबिर अहिल्यानगर येथे सुरू असून या शिबिरासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे खेळाडूंची राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

कोचेसच्या अनुपस्थितीत जिल्हा व्हॉलीबॉल संघटनावर जबाबदारी दिली असून महाराष्ट्र हॉलीबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष शैलेश गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. विशेष म्हणजे शासनाने अद्यापही नेमून दिलेले कोचेस (प्रशिक्षक) हजर नसले तरी, खेळाडूंना कोचिंग (प्रशिक्षण) देण्याची जबाबदारी व्हॉलीबॉल संघटनेला सोपवण्यात आली आहे. व्हॉलीबॉल संघटनेचे पदाधिकारी खेळाडूंना मार्गदर्शन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी तयार करत आहेत.

सरावाचा शुभारंभ जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे हस्ते करण्यात आला. शिबिरासाठी उपलब्ध सुविधा सुसज्ज मैदान साहित्य यामुळे खेळाडू उत्साही वातावरणात सराव करत आहेत.

यावेळी उद्घाटनास क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, क्रीडा मार्गदर्शक विशाल गर्जे, क्रीडा मार्गदर्शक प्रवीण कोंडवले, सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे सचिव प्राध्यापक संजय साठे, अहिल्यानगर व्हॉलीबॉल संघटनेचे सचिव शैलेश गवळी, अविनाश काळे, शहादा मोमीन, सोमनाथ सपकाळ आदी उपस्थिती होते.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि अहिल्यानगर व्हॉलीबॉल संघटना यांच्या संयुक्त प्रयत्नातून हे शिबिर यशस्वीपणे पार पडेल आणि महाराष्ट्राचे संघ राष्ट्रीय स्तरावर चांगले यश मिळवतील, अशी आशा सर्वांनी व्यक्त केली.

# महिलांनी मिळवलेल्या विश्वचषकाचा नगरमध्ये जल्लोष

नगर – महिलांनी मिळवलेल्या विश्वचषकाचा नगरमधील महर्षी ग.ज. चितांबर विद्या मंदिरमध्ये उत्साहात जल्लोष करण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा आनंदोत्सव विद्यालयांमधून साजरा करावा, असे आवाहन केल्याने कन्या विद्यालयाच्या माजी विद्यार्थीनी सौ.स्वाती गांधी यांनी आपल्या मैत्रिणींना एकत्रित करून सुमारे २०० विद्यार्थीनींना साजुक तुपातील बुंदीच्या लाडूंचे वाटप करत क्रिकेट खेळण्याच्या साहित्यासह बुध्दीबळाचा पट, व्हॉलीबॉल, फुटबॉल, बॅडमिंटनचे साहित्य, स्किपिंग थाळीची भेट दिली.

विश्वचषकाचा हा आनंदोत्सव युवतींना प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास सौ.स्वाती गांधी यांनी व्यक्त केला. ज्योत्स्ना मुनोत व सुवर्णा डागा या माजी विद्यार्थीनींनी कन्या विद्यालयातील आठवणींना उजाळा दिला. प्राचार्या सौ. विभावरी रोकडे यांनी विद्यालयाच्या माहेर मेळाव्याचा शुभारंभ या कार्यक्रमाने झाला. माजी विद्यार्थीनी आल्याने आम्हाला मुली माहेरी आल्याचा आनंद झाला, असे सांगितले.

सिद्धी ॲडव्हर्टायझिंग आणि गांधी कुरीअर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमातील उत्साह सर्वांनाच भारावून टाकणारा ठरला. गांधी कुरिअरचे संतोष गांधी यांनी भारतीय महिलांनी मिळवलेल्या विश्वचषकाने महिलांमध्ये उत्साह संचारला, असे सांगितले.

सौ.सुवर्णा डागा यांनी विद्यालयाची माजी विद्यार्थीनी म्हणून शाळेत येताना शाळेतील आठवणींना उजाळा देतच आले. शाळेचे आजचे वैभव पाहून खुप आनंद झाला, असे सांगितले.

या कार्यक्रमास प्रमोद गांधी, संतोष गांधी, साहित्यिक मिलिंद चवंडके, सिद्धी गांधी, श्रवण गांधी, सुवर्णा डागा, ज्योस्ना मुनोत, भारती गुंदेचा, ॲड सौ.मयुरी गुप्ता, वर्षा गांधी, वृषाली राका यांच्यासह विद्यालयाच्या पर्यवेक्षिका श्रीमती मंदा शिंदे, शिक्षक गणेश उघडे, सचिन कोटमे, सौ.मंजुषा जोशी आदी उपस्थित होते.

नव विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. रविंद्र साताळकर व मानद सचिव निलेश वैकर यांनी सिध्दी ॲडव्हर्टायझिंग आणि गांधी कुरिअरने महिला विश्वचषकाचा जल्लोष विद्यालयात येऊन विद्यार्थीनींसोबत साजरा करण्याची बाजी मारली, असे म्हटले. सूत्रसंचालन प्रशांत कुलकर्णी यांनी केले. खाऊसोबत मिळालेले खेळाचे दर्जेदार साहित्य पाहून विद्यार्थीनी आनंदीत झाल्या.

विद्यार्थीनींनी भारत माता की जय असा उच्चस्वरात जयघोष करत आनंदोत्सव साजरा केला.



महिलांनी मिळवलेल्या विश्वचषकाचा नगरमधील महर्षी ग.ज. चितांबर विद्या मंदिरमध्ये उत्साहात जल्लोष करण्यात आला.

# विद्यार्थी दिन

## स्वाभिमान आणि सामाजिक परिवर्तनाचा प्रवास

७ नोव्हेंबर हा भारतीय सामाजिक इतिहासात एका महत्त्वपूर्ण स्मरणदिनी म्हणून आपल्याला परिचित आहे. हा दिवस केवळ दिनदर्शिकेतील एक तारीख नाही, तर स्वाभिमान, समता, शिक्षण आणि मानवी प्रतिष्ठेच्या संघर्षाची एक निर्णायक सुरुवात दर्शविणारा दिवस आहे. सन १९०० रोजी या दिवशी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रथमच सातारा येथील प्रतापसिंह हायस्कूल या शाळेत दाखल झाले. परंतु हा केवळ एखाद्या व्यक्तीचा शाळेत प्रवेश नसून, भारतीय समाजातील अस्पृश्यतेच्या भिंतींना हादरा देणारा आणि 'शिक्षण हेच मुक्तीचे शस्त्र' अशी घोषणा करणाऱ्या एका ऐतिहासिक परिवर्तनाचा प्रारंभ होता. म्हणूनच, या दिवसाचे 'विद्यार्थी दिन' म्हणून साजरे होणे हे शिक्षणाचे महत्व, त्यातील मूल्ये, विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यातील भूमिका आणि समाजातील बदलाच्या प्रक्रियेसाठी शिक्षण किती अपरिहार्य आहे, हे अधोरेखित करणारे आहे.

भारतीय समाजाची रचना दीर्घकाळापासून असमानता, वर्णव्यवस्था आणि सामाजिक स्तरभेद यांच्या आधारे झालेली होती. शिक्षण हे ज्ञानाचे साधन असून, ज्ञान हेच व्यक्तीचे सशक्तीकरण करणारे सर्वात प्रभावी साधन आहे, याची जाण ज्यांच्या हाती होती त्यांनी शिक्षणावर नियंत्रण ठेवून समाजातील दुर्बल, वंचित आणि दबलेल्यांना ज्ञानापासून जाणीवपूर्वक दूर ठेवले. या पार्श्वभूमीवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळाप्रवेश हा एक सामाजिक क्रांतीचा अंकुर होता. हा दिवस केवळ स्मरणाचा दिवस नाही, तर विद्यार्थी या संकल्पनेचा सामाजिक अर्थ पुन्हा ठरविण्याचा, विद्यार्थ्याच्या अस्तित्वाचा गौरव करण्याचा आणि शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे मूलभूत साधन म्हणून पुन्हा अधोरेखित करण्याचा दिवस आहे.

विद्यार्थी दिन साजरा करण्यामागील मूलभूत उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये स्वतःबद्दलची जागरूकता, सामाजिक जबाबदारी, मूल्याधिष्ठित जीवनदृष्टी, आणि ज्ञानाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाची प्रेरणा निर्माण करणे. शिक्षणाचा उद्देश केवळ नोकरी मिळविणे किंवा आर्थिक स्थैर्य प्राप्त करणे एवढाच मर्यादित नाही. शिक्षण व्यक्तीला विचारस्वातंत्र्य, विवेकबुद्धी, आत्मभान आणि सामाजिक न्यायासाठी लढण्याची ताकद प्रदान करते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाचे महत्त्व आत्मसात केले आणि आपल्या संपूर्ण जीवनातून शिक्षण, संघटना आणि संघर्ष या तीन तत्त्वांवर समाजाला चलनवलन देणारी प्रेरणा दिली. विद्यार्थी हा समाजाचा पाया आहे. पायाच जर मजबूत असेल तर संपूर्ण संरचना स्थिर व सक्षम राहते. म्हणूनच विद्यार्थ्यांनी समाज, इतिहास, संस्कृती, राजकारण, अर्थव्यवस्था आणि मानवी मूल्ये याविषयी जागरूक असणे अत्यंत आवश्यक आहे.

सध्याच्या काळात विद्यार्थ्यांपुढे अनेक आव्हाने आहेत. जागतिकीकरण, तंत्रज्ञानातील प्रगती, स्पर्धावृत्ती, बेरोजगारी, मानवी मूल्यांची घट आणि मानसिक आरोग्यावर वाढता ताण ही काही प्रमुख आव्हाने म्हणता येतील. परंतु, विद्यार्थी म्हणजेच परिवर्तनाची शक्ती असून तो परिस्थिती बदलविण्याची क्षमता बाळगून असतो. इतिहास साक्षीदार आहे की, सर्वांत मोठ्या क्रांती, आंदोलनं आणि सामाजिक चळवळी विद्यार्थी वर्गाच्या सहभागामुळेच उभ्या राहिल्या आहेत. स्वातंत्र्यलढ्यात असो, आपत्ती व्यवस्थापनात असो किंवा समाज सुधार चळवळीत असो विद्यार्थ्यांनी नेहमीच पुढे राहून समाजाला योग्य दिशा दिली आहे.

या पार्श्वभूमीवर 'विद्यार्थी दिन' साजरा करणे म्हणजे विद्यार्थ्यांना त्यांच्या ओळखीची, कर्तव्याची आणि सामर्थ्याची जाणीव करून देणे होय. विद्यार्थी हे सामाजिक परिवर्तनाचे वाहक आहेत. त्यांच्यातील विचारांची उंची, दृष्टिकोनाची व्यापकता आणि मनोवृत्तीची सकारात्मकता समाजाला नवीन दिशादर्शन करू शकते. म्हणूनच शिक्षणसंस्था, कुटुंब, समाज आणि शासन या सर्व आघाड्यांवर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वातावरण निर्माण केले पाहिजे. शिक्षण हे मूल्याधिष्ठित, मानवतावादी आणि न्यायनिष्ठ बनले पाहिजे.

आपल्या देशात अजूनही अनेक मुले शिक्षणापासून वंचित आहेत. ग्रामीण भागात, आदिवासी समाजात, कुपोषण, गरीबी, मुलींच्या शिक्षणातील अडथळे, बालमजुरी, अपुरी शैक्षणिक साधने, आणि डिजिटल दरी ही शिक्षणापुढील गंभीर आव्हाने आहेत. या समस्यांच्या मुळाशी सामाजिक असमानता, विषमता आणि आर्थिक दुर्बलता आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला समाजातील विषमता दूर करण्याचे सर्वात प्रभावी साधन मानले. म्हणूनच विद्यार्थी दिनाच्या निमित्ताने आपण शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध, समान, गुणवत्तापूर्ण आणि मूल्याधिष्ठित करण्याची प्रतिज्ञा घेतली पाहिजे.

विद्यार्थी हा केवळ पुस्तकांचा अभ्यास करणारा घटक नाही. विद्यार्थी म्हणजे ज्याच्यात प्रश्न विचारण्याची क्षमता आहे. प्रश्न विचारणे म्हणजेच विचारप्रक्रियेची सुरुवात होय. विचार करण्याची क्षमता हा मानवी संस्कृतीचा पाया आहे. मनुष्यामध्ये इतर प्राण्यांपेक्षा वेगळे काय असते तर ते म्हणजे विचार करण्याची आणि विश्लेषण करण्याची क्षमता. त्यामुळे विद्यार्थी दिन हा प्रश्न विचारण्याचा, संशोधन करण्याचा, जिज्ञासा जागविण्याचा दिवस आहे.

सध्याच्या काळात काही ठिकाणी शिक्षणाचे व्यापारीकरण होताना दिसते. ज्ञान हे विक्रीच्या वस्तूसारखे मांडण्याची प्रवृत्ती वाढताना जाणवते. अशा परिस्थितीत विद्यार्थी दिन आपल्याला शिक्षणातील मूल्यांची आठवण करून देतो. शिक्षण हे समाजातील प्रत्येक घटकाचे मूलभूत हक्क आहे. शिक्षणाचे उद्दिष्ट समाजाला नैतिक, संवेदनशील, सक्रिय आणि प्रगतिशील बनविणे हे आहे. ज्ञानाचा वापर स्वतःच्या प्रगतीसाठी तर करायचाच आहे, पण त्याचबरोबर समाजातील दुर्बल, शोषित आणि वंचित घटकांसाठी संवेदनशील होणे हेही विद्यार्थी असण्याचे आवश्यक मूल्य आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विद्यार्थ्यांना नेहमी सांगितले होते की ''शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा.'' या संदेशात विद्यार्थ्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व घडविण्याचे तत्त्व आहे. शिक्षणाने तुम्हाला बौद्धिक सामर्थ्य मिळते, संघटना तुम्हाला सामूहिक ताकद देते आणि संघर्ष तुम्हाला प्रतिकूलतेवर मात करण्याची तयारी करून देतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणाकडे केवळ परीक्षा किंवा गुणांच्या दृष्टीने पाहू नये. तर शिक्षण हे समाज बदलण्याचे साधन मानून त्याचा उपयोग व्यापक हितासाठी केला पाहिजे.

आज भारताची युवा पिढी जगातील सर्वांत मोठी आहे. युवा म्हणजेच विद्यार्थी वर्ग. ही संख्या भारतासाठी संधी आहे. ही संधी समाजाच्या आणि राष्ट्राच्या विकासासाठी वापरायची की फक्त स्पर्धा, ताण आणि बंदिस्त शिक्षण मॉडेलमध्ये हरवायची, हा निर्णय आज आपणच घ्यायचा आहे. विद्यार्थी दिनाचे औचित्य साधून आपण विद्यार्थ्यांना मुक्त, विचारशील, आत्मनिर्भर, समतावादी आणि सर्जनशील बनविण्याची दिशा निश्चित केली पाहिजे.

विद्यार्थ्यांचे शिक्षण हे केवळ वर्गखोल्यांमध्ये होणारे शिक्षण नाही. समाज, निसर्ग, संस्कृती, इतिहास, कलेची परंपरा, लोकजीवन, तांत्रिक प्रगती, लोकशाही मूल्ये, संविधानाचे तत्त्वज्ञान ही सर्व शिक्षणाची पाठशाळा आहेत. विद्यार्थी हे या सर्वांशी संवाद साधू लागला की त्याची दृष्टी व्यापक होते. या दृष्टीतूनच परिवर्तनाची बीजे उगवतात. शेवटी, विद्यार्थी दिन हा केवळ कार्यक्रम साजरा करण्याचा दिवस नाही. हा चेतनेचा दिवस आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळाप्रवेशापासून सुरू झालेली इतिहासाची वाटचाल आजही आपल्याला समानतेच्या, न्यायाच्या आणि ज्ञानाच्या प्रकाशाकडे घेऊन जाते. आजही अनेकांना शिक्षणाचे दरवाजे पूर्णपणे उघडलेले नाहीत. त्यामुळे हा दिवस नवीन संकल्पांची प्रेरणा देतो. शिक्षण सर्वांसाठी, समान संधी सर्वांसाठी आणि सामाजिक न्याय हा शिक्षणाचा आधार आहे.

विद्यार्थी दिनाच्या या शुभप्रसंगी, प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या अंतरात्म्यातील जिज्ञासेला जागे करावे, सामाजिक प्रश्नांना समजून घ्यावे, संवेदनशील मन ठेवावे आणि आपले शिक्षण समाजाच्या भल्यासाठी वापरावे. आपण सर्वांनी मिळून असे समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावा की जिथे प्रत्येक बालक, प्रत्येक युवक आणि प्रत्येक विद्यार्थी हे सांगू शकतील की शिक्षण माझा अधिकार आहे, ज्ञान माझी शक्ती आहे आणि समाज परिवर्तन माझे ध्येय आहे. याच सत्याची पुनःप्रचीती करून देणारा, ज्ञान, समता आणि प्रगतीचा दीप पेटवणारा ७ नोव्हेंबर हा 'विद्यार्थी दिन' सर्वांना प्रेरणादायी ठरो यासाठी सर्वाना हार्दिक शुभेच्छा आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन....



– डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# कर्करोग बरा होऊ शकतो

## नागरिकांमध्ये जागरूकता व प्रबोधनाची गरज

नागरिकांमध्ये कर्करोग या गंभीर आजाराबाबत जागरूकता निर्माण करणे आणि लवकर निदानाचे महत्त्व पटवून देणे हे राष्ट्रीय कर्करोग दिनाचे उद्दिष्ट आहे. बदलती जीवनशैली व्यसनाधीनतेचे मोठे प्रमाण अशा कारणामुळे वाढत्या कर्क रुग्णांची संख्या आटोक्यात आणण्यासाठी समाजातील सर्व स्तरातून प्रबोधनाची मोठी गरज आहे.

दरवर्षी ७ नोव्हेंबर हा दिवस भारतात राष्ट्रीय कर्करोग जागरूकता दिन म्हणून साजरा केला जातो. कर्करोग हा शरीरातील पेशींच्या अनियंत्रित व असामान्य वाढीमुळे होणारा आजार आहे. या पेशी शरीराच्या कोणत्याही अवयवात किंवा ऊतीमध्ये वाढू शकतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) आकडेवारीनुसार, कर्करोग हा जगातील मृत्यूंच्या प्रमुख कारणांपैकी दुसरा आहे. भारतातही या आजाराचे प्रमाण वाढताना दिसत आहे. बदलती जीवनशैली, तंबाखू व मद्यपानाचे वाढते प्रमाण, असंतुलित आहार, व्यायामाचा अभाव आणि वाढते प्रदूषण ही सर्व कारणे या आजाराला खतपाणी घालत आहेत. त्यामुळे दिवसेंदिवस या आजाराचे रुग्ण वाढत असल्याचे डॉ. सोनवणे यांनी सांगितले.

राष्ट्रीय कर्करोग जागरूकता दिन देशभरात साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागे मुख्य हेतू म्हणजे लोकांपर्यंत कर्करोगाबद्दलची अचूक माहिती पोहोचवणे हा आहे. भारतात जवळपास दोन–तृतीयांश रुग्णांचे निदान उशिरा म्हणजे शेवटच्या टप्प्यात होते, त्यामुळे उपचार कठीण होते व रुग्णांचा जगण्याचा दर कमी राहतो. कर्करोगासारखा गंभीर आजार लवकर ओळखला गेला, तर योग्य उपचारांद्वारे तो पूर्णपणे बरा होऊ शकतो. त्यामुळे वेळेवर तपासणी आणि आरोग्य तपासणी शिबिरे घेऊन रुग्णांचे योग्य निदान करणे महत्त्वाचे ठरते.

कर्करोगाची सामान्य लक्षणे म्हणजे सततचा किंवा वाढता खोकला, शरीरावरील न बरी होणारी जखम, स्तनांमध्ये गाठ किंवा सूज, शौचावाटे रक्तस्राव, अचानक वजन कमी होणे, तसेच दीर्घकाळ थकवा आणि भूक मंदावणे अशी आहेत. अशा प्रकारची लक्षणे आढळल्यास तात्काळ वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे. कर्करोगाच्या ३० ते ५० टक्के प्रकरणांमध्ये फक्त जोखीम घटक टाळून हा आजार रोखता येऊ शकतो. त्यासाठी तंबाखू, गुटखा, मद्यपान पूर्णपणे टाळणे, संतुलित आहार घेणे, नियमित व्यायाम करणे, एचपीव्ही लसीकरण करून गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचा धोका कमी करणे आणि नियमित आरोग्य तपासणी करणे आवश्यक आहे.

सरकारकडून केल्या जाणाऱ्या आरोग्य उपाययोजनांबाबत माहिती देताना डॉ. सोनवणे म्हणाले की, भारत सरकारने राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM²) अंतर्गत कर्करोग, मधुमेह, हृदयविकार व स्ट्रोक प्रतिबंध व नियंत्रणासाठी राष्ट्रीय कार्यक्रम (NPCDCS) सुरू केला आहे. तसेच आयुष्मान भारत योजना सारख्या उपक्रमांद्वारे गरजू नागरिकांना मोफत किंवा स्वस्त आरोग्यसेवा व आर्थिक मदत दिली जाते.

कर्करोगाविरुद्धच्या लढ्यात जागरूकता हे सर्वात प्रभावी शस्त्र आहे. या राष्ट्रीय कर्करोग जागरूकता दिनानिमित्त आपण सर्वांनी कर्करोगाच्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता वेळेवर निदान करणे, तपासणी करून घेणे आणि संतुलित जीवनशैलीचा अवलंब करण्याचा संकल्प केल्यास या दिनाचा हेतू सफल होईल. लवकर निदान म्हणजे सुरक्षित जीवन, आणि जागरूकता म्हणजे आरोग्याचे रक्षण यातूनच मानव कल्याण ही संकल्पना यशस्वी होईल.



– **डॉ. सतिष सोनवणे**
**कॅन्सरतज्ञ, अहिल्यानगर**

# मोफत सुलभ प्राणायाम वर्गाचे आयोजन

नगर – योग विद्या धाम, अहिल्यानगर यांच्या वतीने १० ते १५ नोव्हेंबर या कालावधीत प्राणायाम साधना आरंभ अर्थात सुलभ प्राणायाम वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. हा वर्ग पूर्णतः निःशुल्क असून सर्वांसाठी खुला आहे. प्राणायामाच्या माध्यमातून शारीरिक व मानसिक आरोग्य वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

वर्गाची वेळ सायंकाळी ५ ते ६ अशी असून वर्गाचे स्थळ योगभवन, कुष्ठधाम रोड, सावेडी, अहिल्यानगर येथे आहे. या वर्गाचे मार्गदर्शन योग प्राध्यापक महेमूद नदाफ (योग विद्या गुरुकुल, नाशिक) हे करणार आहेत. संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक : ०२४१–२४२१२५५ / ९४२०७८६१८६.तसेच सौ. मीना देशपांडे ९ ते १५ नोव्हेंबर दरम्यान सकाळी ७ ते ८, अशोकनगर, आधार आपुलकी, आनंदी शाळा, श्री दत्ता दिकोंडा, संध्याकाळी ५ ते ६ तसेच ९ नोव्हेंबर पासून सकाळी ६ ते ७ या वेळेत मारुती मंदिर, सूर्यनगर, तपोवन रोड, सावेडी येथे देखील वर्ग सुरू होणार आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क : बबन बारगळ, मो. ९४२०६३४५८८. असे ठिकठिकाणी विनमूल्य प्राणायाम वर्ग आहेत असे योग विद्या धामचे अध्यक्ष डॉ. सुंदर गोरे यांनी सांगितले आहे.

या मोफत वर्गाचा लाभ लोकांनी घ्यावा असे योग विद्या धामच्या कार्याध्यक्ष सौ. मीना देशपांडे यांनी केले आहे.

# नगरच्या डॉ.स्वरिका देशपांडे-रणदिवे यांना लंडन येथे 'एमआरसीओजी' पदवी प्रदान



नगर – लंडन येथील रॉयल कॉलेज ऑफ इंग्लंड मध्ये अलीकडेच झालेल्या दीक्षांत समारंभात अहमदनगरच्या डॉ. स्वरिका हेमंत देशपांडे रणदिवे यांना MRCOG (Member of the Royal College of Obstetricians and Gynaecologists) ही पदवी बहाल करण्यात आली. या दुर्मिळ सन्मानामुळे त्या भारतातील सर्वात तरुण स्त्रीरोग तज्ज्ञांपैकी एक ठरल्या असून, अहमदनगर शहरातून ही पदवी मिळविणाऱ्या त्या पहिल्या स्त्रीरोग तज्ज्ञ ठरल्या आहेत.

डॉ. स्वरिका देशपांडे रणदिवे यांनी मुंबई येथील केईएम रुग्णालयातून स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र विषयातील पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. त्या एक अनुभवी लेप्रोस्कोपिक शल्यविशारद व वंध्यत्वतज्ज्ञ असून, अत्याधुनिक उपचारपद्धतींचा प्रभावी वापर व रुग्णकेंद्री दृष्टीकोन या गुणवैशिष्ट्यांमुळे त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

विशेष म्हणजे, डॉ. स्वरिका या कठीण व आव्हानात्मक लेप्रोस्कोपिक शस्त्रक्रियांमध्ये प्रावीण्य मिळवलेल्या तज्ज्ञ आहेत. एंडोमेट्रियोसिस, लेप्रोस्कोपिक हिस्टरेक्टॉमी तसेच अंडाशयावरील गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेमध्ये त्यांना विशेष अनुभव आहे. याशिवाय, त्यांनी महिला वंध्यत्व उपचार क्षेत्रात नावलौकिक मिळवलेला असून सध्या अहमदनगर येथील देशपांडे हॉस्पिटलमधील गुडन्यूज आयव्हीएफ सेंटर मध्ये त्या तज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत.

सदर सेंटर मध्ये डॉक्टर अंगद रणदिवे व स्वरीका देशपांडे रणदिवे यांनी आय व्ही एफ तंत्रज्ञान विकसित कसे होईल यावर विशेष भर दिला आहे. सदर सेंटरमध्ये लेझर हॅचिंग व इतर अत्याधुनिक तंत्रज्ञान नगरमध्ये पहिल्यांदा रुग्णांना कसे मिळेल व आय व्ही एफ तंत्रज्ञान कसे यशस्वी होईल यावर विशेष प्रशिक्षण घेऊन काम करण्यावर भर दिला आहे.

डॉ. स्वरिका यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे अहमदनगरसह संपूर्ण महाराष्ट्राच्या वैद्यकीय क्षेत्रात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे. जागतिक स्तरावरील ही पदवी अल्पवयात संपादन करून त्यांनी नगरातील भावी वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी व तरुण डॉक्टरांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

डॉ. स्वरिका या शहरातील ख्यातनाम लेप्रोस्कोपिक जनरल सर्जन डॉ. हेमंत देशपांडे व यशस्वी स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. प्रीती देशपांडे यांची कन्या आहेत. आनंदी बाजार, अहमदनगर येथील देशपांडे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल या त्यांच्या कुटुंबीय संचालित रुग्णालयात त्या कार्यरत आहेत. त्यांच्या या ऐतिहासिक यशाबद्दल देशपांडे कुटुंबीयांबरोबरच नगरकरांमध्येही अभिमानाची व आनंदाची भावना व्यक्त होत आहे.

# अहिल्यानगर केंद्रावरील ६४ व्या हौशी मराठी राज्य नाट्य स्पर्धेला १२ नोव्हेंबरपासून सुरुवात

नगर – सांस्कृतिक कार्य विभाग सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई आयोजित ६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा (२०२५–२६) १२ नोव्हेंबर पासून अहिल्यानगर येथील माउली सभागृह, सावेडी येथे सुरू होत आहे. प्राथमिक फेरीतील या स्पर्धेत १२ नोव्हेंबर ते ५ डिसेंबरच्या दरम्यान रोज संध्याकाळी ८ वाजता नाटकाचे प्रयोग सादर होणार आहेत.

या स्पर्धेत १२ नोव्हेंबर रोजी अहमदनगर फिल्म कंपनीचे 'मॉडर्न फॅमिली', १४ नोव्हेंबर रोजी होप फाऊंडेशनचे 'डिंक', १५ नोव्हेंबर रोजी रंगमुद्रा युवा प्रतिष्ठानचे 'नट नावाचे नाटक', १६ नोव्हेंबर रोजी अजिंक्य कला क्रीडा मंडळाचे 'लंगर', १७ नोव्हेंबर रोजी नाटकवाले सेवाभावी संस्था, संगमनेरचे 'निर्वाण जंक्शन', १८ नोव्हेंबर रोजी नाट्य आराधना संस्थेचे ' द ब्लॅकड इक्रेशन', १९ नोव्हेंबर रोजी नाट्य मल्हार प्रतिष्ठानचे 'अय ..', २० नोव्हेंबर रोजी न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगावचे 'आला रे राजा', २१ नोव्हेंबर रोजी प्रवरा थिएटर्स व एफ. के. क्रीएटीव्ह क्रिएशन्स, शेवगावचे ' उत्खनन', २२ नोव्हेंबर रोजी राजगड प्रतिष्ठानचे 'पिसाळा', २३ नोव्हेंबर रोजी केक फाऊंडेशनचे 'माझं घर', २४ नोव्हेंबर रोजी संकल्पना फाउंडेशन, कोपरगावचे 'स्वप्नवाट', २५ नोव्हेंबर रोजी रंगोदय प्रतिष्ठानचे 'फार्म हाऊस', २६ नोव्हेंबर रोजी समर्थ युवा प्रतिष्ठान, घोडेगावचे 'गेला बाजार', २७ नोव्हेंबर रोजी कल्पद्रुम फाऊंडेशनचे 'लास्ट स्टॉप', २८ नोव्हेंबर रोजी सप्तरंग थिएटर्सचे 'लुई दागेरी ते पिकासो', २९ नोव्हेंबर रोजी शांती फाऊंडेशन, संगमनेरचे 'खतरे मे है' ३० नोव्हेंबर रोजी श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळ, पाथर्डीचे 'नाना जरा थांबा ना', १ डिसेंबर रोजी तुळजा फाऊंडेशन, श्रीरामपूरचे 'दानव', २ डिसेंबर रोजी वात्सल्य प्रतिष्ठानचे ' हॅश टॅग', ३ डिसेंबर रोजी रंगकर्मी संगमनेर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, संगमेनरचे 'पेन', ४ डिसेंबर रोजी विश्वकर्मा क्रीडा सांस्कृतिक युवक कल्याण मंडळाचे 'फक्त लढ म्हणा' आणि ५ डिसेंबर रोजी युवा फिनिक्स फाऊंडेशनचे 'जन्मवारी' ही नाटके सादर होणार आहेत.

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य नाट्य स्पर्धा पार पडणार असल्याचे सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे यांनी नमूद केलेले आहे.

या स्पर्धेमध्ये एकूण २३ संघांचा सहभाग असून अहिल्यानगर जिल्ह्यातील संघ या स्पर्धेत सहभागी होत आहेत. राज्य नाट्य स्पर्धे तील सर्व नाटकांसाठी तिकीट दर : र १५/– व १०/– हे नाममात्र शुल्क असून जास्तीत जास्त प्रेक्षकांनी उपस्थित राहावे आणि हौशी रंगकर्मींचा उत्साह वाढवावा असे आवाहन संचालक बिभीषण चवरे यांनी केलेले आहे.

# गुरु नानक जयंती अनामप्रेमच्या दृष्टिहीन बालकांसह 'आनंदमयी' साजरी

## गो शाळेला एका महिन्यासाठी चारा वाटप, सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनचा उपक्रम



सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनच्या वतीने श्री गुरु नानक देवजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त 'प्रकाश गुरुपूरब' हा विशेष उपक्रम दिव्यांग (दृष्टिहीन) मुलांसह साजरा करण्यात आला.

नगर – सेवाभाव आणि मानवतेचा संगम साकारत, सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनच्या वतीने श्री गुरु नानक देवजी महाराज यांच्या ५५६ व्या जयंतीनिमित्त 'प्रकाश गुरुपूरब' हा विशेष उपक्रम दिव्यांग (दृष्टिहीन) मुलांसह साजरा करण्यात आला. या उपक्रमामुळे गुरुद्वाराचे वातावरण भक्ती, प्रेम आणि आनंदाने भारावले.

अनामप्रेम संस्थेतील दृष्टिहीन बालकांना अहिल्यानगर येथील गुरुद्वारा भाई दया सिंगजी, गोविंदपूरा येथे दर्शनासाठी आणण्यात आले. या मुलांनी कीर्तनात उपस्थिती दर्शवून गुरु ग्रंथ साहिबचे दर्शन घेतले. त्यांच्या चेहऱ्यावरील निरागस हसू आणि समाधान पाहून उपस्थित सर्व महिला भारावून गेल्या.

सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनच्या महिलांनी या मुलांना लंगर प्रसाद वाटप करून गुरु नानकांच्या शिकवणीतील 'सेवा आणि समानता' या मूल्यांचा प्रत्यय दिला. या उपक्रमाअंतर्गत संस्थेने गुरुद्वारातील लंगर सेवेसाठी आर्थिक मदत दिली तसेच निंबळक (एमआयडीसी जवळील सत्यमेव जयते ग्राम) येथील अनामप्रेम गोशाळेसाठी एका महिन्याचा चारा दान करण्यात आला. हा उपक्रम कार्तिक महिन्याच्या शेवटच्या दिवशी झाल्याने त्याला धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्वही लाभले.

या प्रसंगी प्रकल्प प्रमुख स्वीटी पंजाबी, जागृती ओबेरॉय, गीता नय्यर, अर्चना खंडेलवाल, डॉ. सिमरन वधवा, अन्नू थापर, गीता माळवडे, सीमा गुलाटी, ईशा मल्होत्रा, शिल्पा नय्यर, सिमी मक्कर, नीतू सलुजा, सुषिला मोडक, सुलभा मोडक, डॉ. बिंदू शिरसाठ, आरती लोहाडे, अभिलाषा मदान, नंदिनी जग्गी, पूनम धिंग्रा, प्रीती नय्यर, कविता कथेड, शीलू मक्कर, सुरेखा मनियार, उर्मिला झालानी या महिला उपस्थित होत्या.

स्वीटी पंजाबी म्हणाल्या की, गुरू नानक देवजींनी शिकवलेली सेवा, करुणा आणि समानतेची भावना आम्ही प्रत्यक्ष कृतीत आणण्याचा प्रयत्न केला. अनामप्रेमच्या मुलांचे निरागस हास्य हे आमच्यासाठीच सर्वात मोठे समाधान ठरले. आज आम्ही त्यांना आमच्या गुरुद्वारात आणून आशीर्वाद घेण्याची संधी दिली, हा आमच्यासाठी आत्मिक आनंदाचा क्षण होता. लंगर सेवा आणि गोसेवा या दोन्ही माध्यमातून आम्ही समाजातील दुर्बल घटकांपर्यंत प्रेमाचा संदेश पोहोचवला, असल्याचे ते म्हणाल्या.

जागृती ओबेरॉय म्हणाल्या की, दिव्यांग मुलांना केवळ मदतच नाही, तर समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे ही खरी सेवा आहे. गुरू नानक देवजींच्या जयंतीनिमित्त झालेला हा उपक्रम म्हणजे दयाभाव आणि मानवतेचा उत्सव आहे. या उपक्रमात सहभागी सर्व महिलांनी आपल्या वेळेचा व आत्मीयतेचा उपयोग करून जे कार्य केले, ते खरं तर प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे. सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनच्या महिलांनी केवळ लंगर नाही, तर 'मानवी मूल्यांचा' प्रसाद वाटला. सेवा हीच खरी प्रार्थना व माणुसकी असल्याचे त्यांनी सांगितले. अनामप्रेम संस्थेचे अजित माने सर यांनी सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनच्या या उपक्रमाचे कौतुक करून मनःपूर्वक आभार मानले.



गुरू नानकदेव जयंतीनिमित्त लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या सावेडी धर्माधिकारी मळा शाखेतील विद्यार्थ्यांनी गुरूद्वारा येथे जाऊन दर्शन घेतले.

# 'लिटिल फ्लॉवर'च्या विद्यार्थ्यांनी साजरी केली गुरू नानकदेव जयंती

नगर – शीख धर्माचे संस्थापक गुरू नानकदेव जयंतीनिमित्त लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या सावेडी धर्माधिकारी मळा शाखेतील विद्यार्थ्यांनी गुरूद्वारा येथे जाऊन दर्शन घेतले. अनेक भक्तीगीते, प्रार्थना लिहिणाऱ्या गुरू नानकदेव यांनी मानवतेची शिकवण दिली. त्याची माहिती मुलांनी घेतली तसेच गुरू नानकदेव यांच्या प्रती आदरभाव व्यक्त केला.

लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या संचालिका मनिषा बोगावत, विशाल बोगावत यांच्या संकल्पनेतून शाळेत सर्व सण उत्सव, धार्मिक परंपरा साजऱ्या केल्या जातात. शिखांचे पहिले धर्मगुरू गुरू नानकदेव जयंतीनिमित्त मुलांनी नजीकच्या गुरूद्वारा येथे भेट दिली. सर्व मुलांनी श्रद्धापूर्वक दर्शन घेऊन गुरू नानकदेव यांच्या शिकवणुकीची माहिती घेतली. गुरूद्वारा येथील पवित्र वातावरणात सर्व मुलांनी प्रसादाचा आस्वाद घेतला.

मनिषा बोगावत म्हणाल्या, विविधतेतून एकता ही खरी भारतीय संस्कृती आहे. विविध जातीधर्म एकतेची, मानवतेची शिकवण देतात. शीखांचे धर्मगुरू गुरू नानक देव यांच्या महान कार्याची ओळख त्यांच्या जयंतीनिमित्त मुलांना करून दिली.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर


# विज्ञानवार्ता

## रेल्वे अपघात रोखू शकणारा रोबोट

सध्याचा जमाना नॅनो टेक्नॉलॉजी, थ्रीडी प्रिंटर, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ड्रोन आणि अर्थातच रोबोट्सचा आहे. जपान-अमेरिकेसारख्या देशांमध्ये हरेक नमुन्याचे रोबोट बनलेले आहेत. आपल्या देशातही अनेक प्रकारचे रोबोट बनत असतात. अगदी अभियांत्रिकीचे विद्यार्थीही असे रोबोट बनवतात. अशाच काही विद्यार्थ्यांनी रेल्वे अपघात रोखू शकणाराही रोबोट बनवलेला आहे, याची तुम्हाला माहिती आहे का?

रेल्वे अपघातांसाठी असलेल्या प्रमुख कारणांपैकी एक म्हणजे रेल्वे ट्रॅकला गेलेले तडे. रेल्वे ट्रॅकला तडे गेलेले नाहीत का, हे पाहण्याची तसेच त्यांची देखभाल करण्याची जबाबदारी गँगमनची असते. गँगमन नेहमी ट्रॅकची पाहणी करत असतात. पण, हे काम अनेकदा गँगमनच्या जीवावर बेततं. अनेकदा रेल्वे ट्रॅकची पाहणी करताना अपघात होऊन गँगमन जखमी होतात, तसेच मृत्युमुखीही पडतात. एका आकडेवारीनुसार, वेगवेगळ्या अपघातांमध्ये वर्षाला जवळपास ४०० गँगमनचा मृत्यू होतो. यामधील अनेकांचा ट्रेनने धडक दिल्याने मृत्यू झालेला आहे. मात्र, आयआयटी मद्रासच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या रोबोटमुळे अनेक कामगारांचा जीव वाचू शकतो, तसेच प्रवासीही सुरक्षित प्रवास करू शकतात. आयआयटी मद्रासच्या विद्यार्थ्यांनी एक रोबोट तयार केला आहे जो रेल्वे अपघात रोखण्यात मदत करू शकतो. हा रोबोट रेल्वे ट्रॅकसोबत जोडण्यात येईल. हा रोबोट सेन्सरच्या साहाय्याने २ सेंमीपर्यंतच्या तड्याची माहिती देऊ शकतो. तसंच हा रोबोट रिअल टाईम डेटा देणार आहे. या रोबोटमुळे गँगमनला दरवेळी ट्रॅकवर उतरून तडे गेले आहेत की नाही, याची पाहणी करावी लागणार नाही. १.५ फूट उंचीच्या या रोबोटला सहा चाकं असतील. हा रोबोट पुढे आणि मागे अशा दोन्ही बाजूने प्रवास करू शकतो. डेटा गोळा करण्यासाठी रोबोटमध्ये अल्ट्रासॉनिक सेन्सर असणार आहे. रोबोटमधील मायक्रोचिपमध्ये हा डेटा गोळा होईल. जर रुळाला तडा असेल तर मायक्रोचिप लोकेशन आणि अलर्ट पाठवणार. रोबोट वजनाला अत्यंत हलका असणार असून, ट्रेन रुळावरून धावत असतानाही तो हालचाल करू शकतो. रेल्वेसाठी हा अत्यंत स्वस्त उपाय असल्याचं विद्यार्थ्यांनी सांगितलं आहे. रोबोट डेटा पाठवू शकेल, यासाठी सेंट्रल डेटाबेस तयार करण्यात येणार आहे.





## अब्जावधी रुपयांचा जांभळा गुलाबी हिरा

जगातील सर्वात कठीण पदार्थ म्हणजे हिरा. पैलू पाडलेल्या हिऱ्याची लकाकी आपल्याला मोहवत असते. या रत्नाची किंमतही प्रचंड असते. जगात अनेक प्रकारचे हिरे आढळतात. सफेद, निळे, गुलाबी आणि काळेही हिरे आहेत. वेगळ्या रंगांच्या हिऱ्यांना अर्थातच मोठी किंमत मिळत असते. अशाच एका जांभळ्या-गुलाबी रंगाच्या हिऱ्यासाठी कोट्यवधी रुपयांची किंमत मिळाली होती. या हिऱ्याचा हाँगकाँगमध्ये २९.३ दशलक्ष डॉलर्समध्ये लिलाव झाला होता. भारतीय चलनात ही रक्कम २ अब्ज ४७ कोटी २५ लाख ८६ हजार ३५७ रुपये इतकी होते! आता तुम्हाला प्रश्न पडला असेल की या हिऱ्याचे नाव काय? त्याची वैशिष्ट्ये काय? याला एवढी किंमत कशी मिळाली? तर याची आम्ही तुम्हाला माहिती देणार आहोत.






या हिऱ्याचे नाव आहे साकुरा. हा एक जपानी शब्द आहे. ज्याचा अर्थ चेरी ब्लॉसम म्हणजे चेरीप्रमाणे खुलणे. 'दी साकुरा' हा १५.८ कॅरेटचा जांभळा गुलाबी रंगाचा हिरा आहे. हा हिरा प्लॅटिनम आणि सोन्याच्या अंगठीत बसवण्यात आला आहे. हा हिरा 'फॅन्सी विविड' च्या वर्गीकरणात येतो. त्याचा रंग आणि आकर्षण लक्षात घेता तो फॅन्सीच्या श्रेणीमध्ये ठेवले गेले आहे. मात्र, इतर हिऱ्याप्रमाणे त्याचा रंग चमकदार नाही. तसेच तो दूरवरून दिसू शकत नाही. त्याचा जांभळा गुलाबी रंग केवळ सूक्ष्मदर्शकातूनच दिसू शकतो. हा हिरा हाँगकाँगमधील लिलावात एका आशियाई खासगी खरेदीदाराने खरेदी केला होता.

## शहामृगाविषयीचा गैरसमज

ऑस्ट्रिच म्हणजेच शहामृग हे पक्षी आफ्रिका खंडात आढळतात आणि ते वेगवेगळ्या प्रकारच्या नैसर्गिक अधिवासात राहतात. त्यामध्ये गवताळ कुरणे, सॅवाना आणि वाळवंटी भागाचाही समावेश होतो. ते जगातील सर्वात मोठ्या आकाराचे पक्षी असून त्यांचे वजन १३० किलोपर्यंत असते. त्यांची उंची नऊ फुटांपर्यंतही असू शकते. त्यांच्या शरीराच्या तुलनेत डोके अतिशय लहान आकाराचे असते. अनेक वेळा त्यामुळेच त्यांच्याबाबत अनेक गैरसमज निर्माण होतात. त्यापैकी एक सर्वात मोठा गैरसमज म्हणजे शहामृग वाळूत आपले डोके पुरून उभे राहतात!

अनेक शतकांपासून हा गैरसमज सर्वसामान्य लोकांमध्ये पसरलेला आहे.'बरी युअर हेड इन द सँड' ही म्हणही इंग्रजीत आहे. ज्यावेळी एखाद्याला समोरच्या संकटाचा समोरासमोर सामना करता येत नसेल तर त्याबाबत ही म्हण वापरली जाते. अर्थातच असे काही शहामृगाबाबत घडत नाही. रोमन निसर्गतज्ज्ञ प्लिनी द एल्डर किंवा गैस प्लिनिअस सेकंदस याने या गैरसमजाला हातभार लावलेला आहे. सुरुवातीच्या काळातील एन्सायक्लोपिडियाच्या संग्रहाची निर्मिती त्याने केली होती. 'द नॅचरल हिस्टरी'च्या दहाव्या पुस्तकात त्याने म्हटले आहे की शहामृग हा एक मूर्ख पक्षी असून तो स्वतःला लपवण्यासाठी आपले डोके झुडपात लपवतो व त्याला वाटते की आपण इतरांच्या नजरेतून अदृश्य झालो



आहे! आपले भले मोठे शरीर दिसत आहे हे त्याला कळत नाही. शहामृगामध्ये अनेक चांगली वैशिष्ट्ये आहेत, तो काहीही खाल्लेले पचवू शकतो, पण त्याचा मूर्खपणाही लक्षणीय आहे, असे त्याने म्हटले होते. त्याच्या या शेऱ्याने शहामृग वाळूत आपले डोके लपवतो हा समज निर्माण झाला. खरे तर अन्य पक्ष्यांप्रमाणेच अनेक सवयी या पक्ष्यामध्येही आहेत. त्याचे डोके नेहमी जमीनीजवळ असते व त्याचे कारण खाद्य शोधणे हे आहे. त्यामध्ये गवतापासून ते उंदीर, बेडूक व लहानमोठे किडे यांचा समावेश असतो; मात्र घरटे बांधून अंडी घालणाऱ्या अन्य पक्ष्यांच्या विपरित शहामृग हे वाळू किंवा मातीत छोटा खड्डा करून त्यामध्ये अंडी घालतात. नर व मादी दोघेही ही अंडी दिवसातून अनेक वेळा फिरवत असतात जेणेकरून त्यांना सर्व बाजूंनी उष्णता मिळावी. त्यांच्या या सवयींमुळे ते आपले डोके जमीनीत पुरत असल्याचा समज बनला!



## मंगळावरील चुंबकीय क्षेत्राचा धक्का

पृथ्वीचा शेजारी ग्रह असलेल्या मंगळावर एकेकाळी जीवसृष्टीला पोषक स्थिती होती. खडकाळ पृष्ठभाग, योग्य तापमान तसेच वाहते पाणीही होते. मात्र काळाच्या ओघात येथील पाणी नष्ट झाले व मंगळ कोरडा पडला. त्यामागील एक कारण म्हणजे या ग्रहाने आपले चुंबकीय क्षेत्र गमावले. मात्र आतापर्यंतच्या अनुमानानुसार हे चुंबकीय क्षेत्र जितका काळ अस्तित्वात होते असे मानले जात होते, त्यापेक्षा किती तरी अधिक काळ ते टिकून राहिले होते असे एका नव्या संशोधनातून आढळले आहे. नव्या संशोधनानुसार मंगळाचे चुंबकीय क्षेत्र अनुमानापेक्षा २० कोटी वर्षे अधिक काळ टिकून राहिले.

हार्वर्ड युनिव्हर्सिटीतील खगोलशास्त्रज्ञांनी याबाबतचे संशोधन केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार चुंबकीय क्षेत्राच्या ध्रुवांमध्ये झालेल्या अदलाबदलीचा प्रभाव मंगळावर विपरितरित्या पडला. इम्पॅक्ट क्रेटरसारख्या रचनांमुळे कालौघात मंगळाचा मॅग्नेटिक डायनॅमो बदलला असा एक गैरसमज निर्माण झालेला आहे. ही विवरे अन्य खगोलांच्या मंगळाशी झालेल्या धडकेमुळे बनलेली आहेत.

हार्वर्ड विद्यापीठाच्या सारा स्टेली यांनी सांगितले की मंगळाच्या इतिहासात नेमके काय घडले हे जाणून घेण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. त्यासाठी एखाद्या ग्रहाचे चुंबकीय क्षेत्र बरेच काही सूचवत असते. एखाद्या ग्रहाच्या खोलवरील जिओडायनॅमो प्रभावामुळे ग्रहाचे चुंबकीय क्षेत्र निर्माण होत असते. पृथ्वीसारख्या ग्रहाचा विचार करता, हे पृथ्वीच्या आयर्न-निकेल कोअरमुळे बनलेले आहे. या कोअरचे दोन भाग असून एक अंतर्गत भाग हा घनरुप असून बाहेरचा भाग हा वितळलेला आहे. मंगळ हा ग्रह पृथ्वीच्या तुलनेत निम्म्या व्यासाचा आहे. सुरुवातीच्या काळात प्रत्येक ग्रहाचा अंतर्गत कोअर हा अत्यंत उष्ण असल्याने वितळलेलाच असतो. तो थंड होत गेला की घनरुप होतो. पृथ्वीच्या तुलनेत मंगळाचा आकार लहान आहे व त्याचा अंतर्गत भागही लवकर थंड झाला. एखाद्या ग्रहाचे चुंबकीय क्षेत्रच त्याचे सौरवादळ किंवा हानीकारक अवकाशीय किरणोत्सर्गापासून संरक्षण करीत असते. मंगळाचे चुंबकीय क्षेत्र नष्ट झाल्याने त्याचे वातावरणही नष्ट झाले व त्याबरोबरच संरक्षक कवच नसल्याने हानीकारक अवकाशीय किरणे थेट पृष्ठभागापर्यंत येऊ लागली.




## मानवप्रजातीचे गूढ उंलगणारे पुरावे

आधुनिक मानव हा होमो सेपियन्सचा वंशज मानला जातो; मात्र केवळ हीच एकमेव मनुष्य प्रजाती होती असे नव्हे. निएंडरथल, डेनिसोवन, होमो फ्लोरेसिएन्सिस यासारख्या अनेक मनुष्य प्रजाती विकसित झाल्या होत्या. त्यापैकी अनेक प्रजाती कालौघात एक तर नष्ट झाल्या किंवा होमो सेपियन्समध्ये मिसळून लुप्त झाल्या. १ लाख ३० हजार वर्षांच्या काळात होमो सेपियन्स, निएंडरथल व डेनिसोवन यासारखे मानव ज्या मार्गाने सर्वत्र विखुरले किंवा स्थलांतरित झाले तो मार्ग पुरातत्त्व संशोधकांनी ताजिकीस्तानात शोधला आहे. तेथे त्यांना उत्खननात याबाबतचे पुरावे सापडले असून याठिकाणी तिन्ही प्रजातीचे मानव राहिले असल्याचे पुरावे सापडले आहेत. तिथे त्या काळातील दगडी अवजारे तसेच प्राण्यांची हाडेही सापडली आहेत.

पुरात्त्व संशोधकांना दीर्घकाळापासून याची कल्पना होती की आधुनिक माणूस आणि त्याचे जवळचे नातेवाईक असलेले मानव ज्याला 'इनर एशियन माऊंटन कॉरिडॉर' असे संबोधले जाते अशा मध्य आशियातील मार्गाने पाषाण युगात स्थलांतरित झाले होते. काळाच्या ओघात या भागात निएंडरथल, डेनिसोवन आणि आधुनिक मानवाच्या अस्तित्वाचे अनेक पुरावेही सापडत गेले. याठिकाणी कदाचित तिन्ही प्रजातीच्या मानवांची एकमेकांशी भेट होऊन त्यांच्यामध्ये संपर्कही झाला असावा, असे संशोधकांना वाटते. याबाबतच्या संशोधनाची माहिती 'अँटिक्विटी' या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. विशेष म्हणजे हा संपूर्ण परिसर अद्यापही संशोधनाच्या दृष्टीने काहीसा दुर्लक्षितच राहिलेला आहे. इस्रायलमधील हिब्रु युनिव्हर्सिटी ऑफ जेरुसलेममधील इन्स्टिट्यूट ऑफ आर्कियोलॉजीमधील प्राध्यापक योस्सी झैदनर यांनी सांगितले की हा परिसर अनेक मानव प्रजातींसाठी स्थलांतराचा मार्ग राहिलेला असावा. त्यामध्ये आधुनिक होमो सेपियन मानव तसेच निएंडरथल व डेनिसोवन यांचा समावेश होतो. त्यांचे याठिकाणी सहअस्तित्वही राहिलेले असु शकते. या संशोधनासाठी झैदनर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मध्य आशियातील मुख्य नदी असलेल्या झेरावशान नदीच्या काठावरील पाषाणयुगातील ठिकाणांचा शोध घेतला. तेथील उत्खननात वेगवेगळ्या स्तरांमध्ये पाषाणयुगातील अनेक पुरावे आढळले. वेगवेगळ्या काळात याठिकाणी विविध मानवांनी आश्रय घेतला असल्याचे दिसून आले.

## चक्क ताजमहालच्या बांधकामाचा 'एआय' व्हिडीओ!

प्लाएआय' मुळे आता लोकांच्या कल्पनाशक्तीला नवे धुमारे फुटत आहेत. 'एआय'च्या सहाय्याने इतिहासातीलही अनेक घटनांचे काल्पनिक व्हिडीओ बनवण्यात येत असतात. प्रेम आणि त्यागाचं प्रतीक अशी ओळख असणारी एक आश्चर्यकारक वास्तू म्हणजे ताजमहाल. आग्रा येथे अतिशय दिमाखात उभ्या असणाऱ्या या संगमरवरी वास्तूनं गेली कैक वर्ष जणू इतिहासच जीवंत करून आपल्यासमोर मांडला. अशी ही वास्तू नेमकी कशी साकारली गेली, त्यासाठी किती खर्च आला यासंदर्भातील अनेक संदर्भ आजवर सांगितले गेले. आता ताजमहालच्या बांधकामाचा 'एआय' व्हिडिओ सोशल मीडियात आला आहे.

जगभरात आश्चर्यानं उल्लेखल्या जाणाऱ्या या वास्तूला साकारतानाचा काळ नेमका कसा होता, कच्चा माल या वास्तूपर्यंत कसा आणला गेला हे सर्वकाही दाखवणारा एक व्हिडीओ नुकताच सोशल मीडियावर शेअर करण्यात आला. एका इन्स्टाग्राम अकाऊंटवरून हा व्हिडीओ शेअर करण्यात आला असून, एआयचा उत्तम वापर नेमका कसा करता येतो हेच या व्हिडीओच्या माध्यमातून पाहता येत आहे. कृष्णधवल छटेमध्ये असणाऱ्या या व्हिडीओमध्ये वर्षानुवर्षे कशा पद्धतीनं ताजमहाल साकारण्यासाठी कच्चा माल आणला गेला, कशा पद्धतीनं मोठाले संगमरवरी दगड या वास्तूच्या उभारणीसाठी रचले गेले आणि यासाठी



प्राण्यांपासून मनुष्यबळाचा नेमका कसा वापर करण्यात आला याचं चित्रण व्हिडीओमध्ये दाखवण्यात आलं आहे. तंत्रज्ञानाचा वापर केल्यास नेमकं काय आणि किती कमाल साध्य होऊ शकतं, हे हा व्हिडीओ पाहताना लक्षात येतं. जवळपास २२ वर्षे मजुरांच्या प्रचंड मेहनतीनंतर ताजमहालसारखी अद्वितीय वास्तू साकारण्यात आली आणि शतकानुशतके ही सुंदर वास्तू प्रेमाचे प्रतीक म्हणून लोकप्रिय ठरली.

## व्यसनमुक्तीसाठीही व्यायामोपचार

शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी व्यायामाची नितांत आवश्यकता असते हे आपल्याला माहिती आहेच, पण व्यसनमुक्तीसाठीही व्यायाम लाभदायक ठरू शकतो असे संशोधनात आढळलेले आहे. अॅरोबिक व्यायामामुळे अमली पदार्थ आणि मद्याचे व्यसन असणाऱ्यांच्या उपचारात मदत होऊ शकते, असे एका अभ्यासात आढळून आले आहे.

कार्डिओ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अॅरोबिक व्यायाम प्रकारामुळे हृदयाचे स्पंदन आणि श्वासोच्छ्वास वाढतो, त्याचप्रकारे रक्तामध्ये अधिकाधिक ऑक्सिजनचा प्रसार होतो. यामुळे मधुमेह, संधिवात, हृदयरोगांसारख्या आरोग्याच्या इतर समस्यादेखील कमी होत असल्याचे आढळते. यामुळे मानसिक ताण, चिंता आणि नैराश्य कमी करण्यातदेखील मदत होते. अमेरिकेतील बफेलो विद्यापीठातील संशोधकांनी अॅरोबिक व्यायामामुळे मेंदूवर होणारा परिणाम आणि त्याचा व्यसनमुक्तीवर पडणारा प्रभाव याचा अभ्यास केला. अॅरोबिक व्यायामामुळे या व्यतिरिक्तदेखील फायदे होत असल्याचे अनेक अभ्यासांमधून समोर आले आहे. हा व्यायाम मद्य, निकोटिन, ओपीआइडस्? यासारख्या वेगवेगळ्या व्यसनाच्या विविध टप्प्यांवर मदत करू शकतो, असे बफेलो विद्यापीठातील ज्येष्ठ संशोधक पॅन्योटिस थॅनोस यांनी म्हटले आहे. रोज अॅरोबिक व्यायाम केल्यामुळे मेसोलिम्बिक डोपामाइन प्रक्रियेत बदल होतो. डोपाम चेंतातंतूमध्ये तयार होणारे रसायन व्यसनाशी संबंधित असून काही तरी मिळविल्याची भावना, प्रेरणा आणि शिकण्यासाठी महत्त्वपूर्ण असते. व्यायामामुळे अमली पदार्थांमुळे बदल झालेली डोपामाइन संकेत प्रक्रिया सामान्य होऊ शकते. त्याचप्रमाणे याचा उपचारपद्धतीत कशा प्रकारे वापर केला जाऊ शकतो यावर अभ्यास सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे व्यसनांवर जे अभ्यासकेंद्रित आहेत त्यांनी संशोधकांना व्यसनातून सुटलेल्या लोकांनी पुन्हा व्यसनाकडे न वळण्यासाठी नवी उपचारपद्धती विकसित होऊ



## समस्या खांदा निखळण्याची...

मानवी शरीरातील सर्वात जास्त हालचाल करणारा सांधा म्हणजे खांद्याचा सांधा. या सांध्यात हाताच्या वरच्या हाडाचा (ह्यूमरस) गोलाकार भाग, खांद्याच्या हाडातील (स्कॅप्युला) कपासारख्या पोकळीत बसलेला असतो. हा सांधा अत्यंत लवचिक असल्याने तो जागेवरून सुटण्याची (डिसलोकेट होण्याची) म्हणजेच निखळण्याची शक्यता अधिक असते. खांदा निखळल्यास ह्यूमरस हाड त्या कपातून बाहेर येते आणि खांदा विकृत दिसतो.

खांदा निखळल्याची शंका आल्यास तात्काळ वैद्यकीय मदत घेणे अत्यावश्यक आहे. योग्य उपचार घेतल्यास बहुतांश रुग्ण काही आठवड्यांत खांद्याचा पूर्ण वापर पुन्हा करु शकतात. मात्र, एकदा खांदा निखळल्यावर तो पुन्हा सुटण्याची प्रवृत्ती वाढते. विशेषतः वय जितके लहान असेल तितकी खांदा पुन्हा निखळण्याची (रिडिसलोकेशन) शक्यता अधिक असते. साधारणतः २० व्या वर्षापर्यंत ती ८५ टक्के इतकी असते.

**लक्षणे कोणती?**

खांदा जागेवरून हलणे किंवा विकृत दिसणे, सूज येणे किंवा निळसर- काळसर डाग पडणे (ब्रूझिंग), तीव्र वेदना जाणवणे, हात हलवता न येणे किंवा सांधा हलवताना तीव्र वेदना होणे इत्यादी. याखेरीज काही रुग्णांमध्ये हातात किंवा मानेत मुंग्या येणे, बधिरपणा किंवा अशक्तपणा जाणवतो. खांद्याभोवतालचे स्नायू आकसल्यामुळे वेदना आणखी वाढतात.

**काय करावे?**

जर खांदा निखळल्याची शंका असेल, तर तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. तोपर्यंत खांदा हलवू नका. हात ज्या स्थितीत आहे, त्याच स्थितीत स्लिंग किंवा स्प्लिंटने स्थिर ठेवावा. खांदा जबरदस्तीने परत जागेवर बसवू नये. त्यामुळे हाडे, स्नायू, लिगामेंट्स, नसा किंवा रक्तवाहिन्या दुखावू शकतात. त्या भागावर बर्फाचा थंड पॅक लावल्यास सूज व वेदना कमी होतात.

**खांदा निखळण्याची कारणे काय?**

खांद्याचा सांधा शरीरातील सर्वाधिक डिसलोकेट होणारा सांधा आहे. कारण त्याची हालचाल अनेक दिशांना होते. त्यामुळे खांदा पुढे, मागे किंवा खाली या तिन्ही दिशांनी निखळू शकतो. कधी पूर्णपणे, तर कधी अंशतः हाड कपातून बाहेर येते. बहुतेक वेळा खांदा पुढे (फॉरवर्ड) सटकण्याची शक्यता असते. यावेळी खांद्यातील लिगामेंट्स (हाडांना जोडणारे ऊतक) ताणले जातात किंवा फाटतात.



जोरदार धक्का बसणे किंवा खांद्याला अचानक झटका बसणे, हात अतिप्रमाणात फिरवणे यामुळे खांद्याचे हाड जागेवरून निघू शकते.

क्रिकेट, फुटबॉल, हॉकीसारख्या क्रीडाप्रकारांमध्ये किंवा जिम्नॅस्टिक्स, स्कीईंग, व्हॉलीबॉलसारख्या पडण्याची शक्यता असलेल्या खेळांमध्ये खांदा निखळण्याची समस्या सर्रास घडते. याशिवाय वाहन अपघातात खांद्यावर तीव्र धक्का बसल्यास हाड जागेवरून निघू शकते. तसेच जिना, शिडी किंवा ओल्या फरशीवरून पडताना खांदा चुकीच्या स्थितीत आपटल्यास डिसलोकेशन होऊ शकते. खांदा निखळण्याची शक्यता सर्वांनाच असते; मात्र ही दुखापत तरुण व्यक्तींमध्ये जास्त प्रमाणात दिसते.

खांदा निखळल्याने खांद्याचे स्नायू, लिगामेंट्स आणि टेंडन्स फाटणे किंवा ताण येणे, नसा किंवा रक्तवाहिन्या दुखावणे, पुन्हा पुन्हा खांदा सुटण्याची प्रवृत्ती वाढणे या समस्या उद्भवतात. खांद्यातील लिगामेंट्स, टेंडन्स किंवा नसा गंभीररीत्या दुखावल्यास शस्त्रक्रियेची आवश्यकता भासू शकते.

खांदा सुटण्याची शक्यता कमी करण्यासाठी घरात किंवा कार्यस्थळी घसरट जागा टाळा. शिडी वापरताना काळजी घ्या. खेळताना योग्य सुरक्षात्मक गिअर वापरा. खांद्यातील स्नायू आणि सांधे मजबूत ठेवण्यासाठी नियमित व्यायाम करा. लवचिकता आणि स्थैर्य वाढवणारे व्यायाम विशेषतः महत्त्वाचे आहेत. एकदा खांदा निखळल्यावर, तो पुन्हा सुटू नये म्हणून डॉक्टरांनी सांगितलेले स्ट्रेन्थनिंग आणि स्टॅबिलिटी व्यायाम नियमितपणे करणे आवश्यक असते.

एकुणातच, खांदा निखळणे ही वेदनादायक पण उपचारयोग्य अवस्था आहे. योग्य उपचार, विश्रांती आणि व्यायाम यांचा समतोल साधल्यास खांदा पुन्हा पूर्ववत कार्यक्षम होऊ शकतो. मात्र, स्वतः खांदा बसवण्याचा प्रयत्न केल्यास कायमस्वरूपी नुकसान होऊ शकते. त्यामुळे नेहमी तज्ज्ञ वैद्यकीय मदत घ्यावी.

**- डॉ. सम्यक पंचोली,**
शोल्डर आणि अप्पर लिंब सर्जन,
संपर्क ८९८९३२९३२९

# जैन मंदिर हा विकण्याचा घाट हाणून पाडणार

## माजी आमदार रविंद्र धंगेकर

नगर – नगर शहरातील जैन समाजाची जागा व त्या ठिकाणी असलेले मंदिर हा विकण्याचा घाट घातला जात आहे. ते वाचविण्याचा मुद्दा आहे. हा विकण्याचा घाट आम्ही हाणून पाडणार. त्या जागेच्या विक्रीप्रकरणी दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी पत्रकार परिषदेमध्ये केली. जैन समाजातील काही ट्रस्टींनी चुकीच्या पद्धतीने कारभार करत ही जागा विक्रीला काढल्याचा आरोप त्यांनी केला आहे. ठाकरे शिवसेना शहरप्रमुख किरण काळे यांनी हे प्रकरण उजेडात आणले. काळेंनी सह धर्मदाय आयुक्तांकडे लेखी तक्रारही दाखल केली असल्याची माहिती धंगेकर यांनी दिली.



नगर शहरातील जैन समाजाची जागा व त्या ठिकाणी असलेले मंदिर बाबत आयुक्तांशी चर्चा करताना माजी आ. रविंद्र धंगेकर. समवेत खासदार निलेश लंके, किरण काळे, विक्रम राठोड आदी.

पत्रकार परिषदेला खासदार निलेश लंके, किरण काळे, युवा सेनेचे राज्य सहसचिव विक्रम राठोड, शिवसेनेचे मनोज गुंदेचा, विकेश गुंदेचा, महावीर मुथा यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. पत्रकार परिषदेपूर्वी आयुक्त यशवंत डांगे यांची भेट शिष्टमंडळाने घेतली. यावेळी मंदिराच्या जागेतील अतिक्रमित बेकायदेशीर बांधकाम पाडण्याचा तक्रार अर्ज काळे यांनी दिला.

धंगेकर म्हणाले की, जैन मंदिराची ही जागा गेल्या ७०–८० वर्षांपूर्वी महानगरपालिकेच्या नोंदीमध्ये मंदिर म्हणून नोंदवलेली आहे. मूळतः ही जागा जैन समाजाला देताना ती विकू नये असे स्पष्टपणे कागदपत्रांत नमूद आहे. मात्र तरीही ट्रस्टींनी धर्मदाय आयुक्तांची कोणतीही परवानगी न घेता पेपरमध्ये जाहीर नोटीस प्रसिद्ध करून जागा विक्रीला काढल्याचा आरोप त्यांनी केला. ज्याने जागा घेणार, त्याने नंतर धर्मदाय आयुक्तांची परवानगी घ्यावी, असा उलट न्याय कसा? असा सवाल उपस्थित करत, हा प्रकार दिशाभूल करणारा व गैरकायद्याचा असल्याचे त्यांनी सांगितले. संबंधित ट्रस्टींवर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी त्यांची मागणी आहे. तसेच, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई व्हावी. मंदिरांवरील अथवा धर्मस्थळांवरील अतिक्रमणाविरोधात कोणाच्याही विरोधात वैर ठेवता लढा देणार आहोत. जैन समाज पुढे आला नाही तरी आम्ही फिरून त्यांच्याकडून जागा वाचवण्यासाठी निधी उभारू, असा टोला त्यांनी लगावला. तसेच ट्रस्टींनी तत्काळ राजीनामा द्यावा, नसल्यास न्यायालयात धाव घेऊ, असा इशारा धंगेकर यांनी दिला.

दरम्यान, या प्रकरणात फौजदारी कारवाई करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. कोणत्याही परिस्थितीत जैन मंदिर व जागा वाचवलीच पाहिजे, अशी भूमिकाही त्यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केली. येत्या एक दोन दिवसात ट्रस्ट अध्यक्ष सुभाष मुथा आणि अन्य ट्रस्टीं विरुद्ध पोलिसांत फिर्याद देणार असल्याचे काळे म्हणाले.

खासदार निलेश लंके म्हणाले, धर्मस्थळाची जागा बळकावण्याचा प्रकार झाल्यास लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही एकत्र आलो आहोत. महानगरपालिकेकडून उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहेत, ही बाब चिंताजनक आहे. संबंधित ट्रस्टींना जागा विकण्याचा अधिकारच नाही, असा दावा त्यांनीही केला.

### जैन युवकांनी पुढे यावे, भगवान महावीर सेना स्थापन करावी

या संदर्भात राज्यभरातील असे प्रश्न मार्गी लावण्यासाठी व समाजासाठी काम करण्यासाठी जैन समाजाने पुढाकार घेऊन गटातील युवकांनी 'भगवान महावीर सेना' संघटना स्थापन करावी, असे आवाहनही धंगेकर यांनी केले. जैन समाजाच्या धर्मस्थळांवर कुणी अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करत असल्यास त्याविरोधात संघटित चळवळ उभारण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

# शाळेजवळील कचराकुंडी त्वरित हटवा; नागरिकांची महापालिकेकडे मागणी

## परिसरात अस्वच्छतेचा वास, नागरिक त्रस्त

नगर – मुकुंदनगर, गोविंदपुरा परिसरातील जिल्हा परिषद शाळेजवळ उभारण्यात आलेली कचराकुंडी नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका ठरत असून, ती तात्काळ हटविण्याची मागणी स्थानिक नागरिक, पालक व माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इसहाक यांनी महानगरपालिकेकडे केली आहे. या ठिकाणी दररोज मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जातो. परिणामी परिसरात असह्य दुर्गंधी पसरली असून, माशा–मच्छरांचा प्रादुर्भाव वाढल्याने डेंग्यू, मलेरिया, टायफॉईड यांसारख्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. शाळेजवळ असल्याने लहान मुलांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होत असल्याचे पालकांनी नमूद केले आहे.



मुकुंदनगर, गोविंदपुरा परिसरातील जिल्हा परिषद शाळेजवळ उभारण्यात आलेली कचराकुंडी हटवावी, या मागणीचे निवेदन नागरिकांच्यावतीने महापालिकेकडे देण्यात आले.

गोविंदपुरा परिसर हा घनदाट लोकवस्तीचा भाग आहे. कचराकुंडीमुळे केवळ अस्वच्छतेचे साम्राज्य निर्माण झाले नसून, नागरिकांना दररोज दुर्गंधीतून त्रास सहन करावा लागत आहे. स्थानिकांनी वारंवार तोंडी तक्रारी करूनही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, अशी नाराजी नागरिकांनी व्यक्त केली.

यासंदर्भात फकीरवाडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने आणि शेख मुदस्सर यांनी महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांना लेखी निवेदन दिले असून, या ठिकाणावरील कचराकुंडी तात्काळ हटवून तेथे असलेले डम्पिंग ग्राउंड कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी करण्यात आली असून प्रमुख मागणी मुकुंदनगर जिल्हा परिषद शाळेजवळील गोविंदपुरा येथील कचराकुंडी तात्काळ हटवावी, त्या ठिकाणी पुन्हा डम्पिंग होऊ नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करावी, परिसरात स्वच्छता मोहीम राबवून नागरिकांना दिलासा द्यावा, शाळेच्या परिसरात आरोग्य व स्वच्छतेचे निरीक्षण करण्यासाठी स्वतंत्र समिती नेमावी व कचराकुंडी न हटवल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# महाराष्ट्र प्रादेशिक ग्रामीण बँक कर्मचारी व अधिकारी संघटनेचे शिर्डी येथे ८ व ९ नोव्हेंबरला राज्य अधिवेशन

नगर – भारत सरकारने एक राज्य एक ग्रामीण बँक असे धोरण राबवत ग्रामीण बँकिंग रचनेत बदल घडवून आणले आहेत, पण खऱ्या अर्थाने ग्रामीण पतपुरवठा व्यवस्थेला मजबुती प्राप्त करून द्यावयाची असेल तर ग्रामीण पतपुरवठा व्यवस्थेची नळ मध्यवर्ती बँकिंगशी जोडली गेली पाहिजे आणि ही तेंव्हाच शक्य आहे जेंव्हा प्रादेशिक ग्रामीण बँकांचे पुरस्कृत बँकेत समिलीकरण (merger) केले जाईल त्यासाठी महाराष्ट्र ग्रामीण बँक कर्मचारी तसेच अधिकारी संघटनेचे शिर्डी येथे ८ व ९ नोव्हेंबर रोजी १७ वे संयुक्त द्विवार्षिक अधिवेशन आयोजित केले असल्याचे कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस कॉ. सुजय नळे यांनी सांगितले

हे अधिवेशन एक विशेष ठराव संमत करून केंद्र सरकारकडे मागणी करत आहे. याशिवाय सरकारतर्फे असे जाहीर करण्यात आले आहे की वित्तीय वर्ष २६–२७ मध्ये तीन ते चार प्रादेशिक ग्रामीण बँकांचे भांडवल काही प्रमाणात खाजगी विक्रीसाठी खुले करण्यात येईल आणि तसे झाले तर प्रादेशिक ग्रामीण बँकांचे प्रयोजनच बदलेल. आज या बँकांनी छोट्या आणि मध्यम शेतकऱ्यांना तसेच शेतीशी पूरक छोट्या उद्योगांना कर्ज देणे अपेक्षित आहे पण एकदा खासगी भांडवल ग्रामीण बँकेतून आले तर सामाजिक नफ्याची जागा आकड्यांच्या परिभाषेतला नफा घेईल आणि मग या बँका नफा, अधिकाधिक नफा, वाट्टेल ते करून नफा यासाठी काम करतील आणि त्या प्रक्रियेत छोटा आणि सामान्य माणूस बँकिंगच्या वर्तुळबाहेर म्हणजेच विकासाच्या वर्तुळाबाहेर फेकला जाईल, या प्रश्नावर अखिल भारतीय संघटनेतर्फे व्यापक मोहीम हाती घेण्यात येत आहे ज्याचं उद्दिष्ट या प्रश्नावर जनतेत, लोकप्रतिनिधीमध्ये जागृती घडवून आणणे ही आहे. याशिवाय संघटनेतर्फे ग्रामीण बँकेतून मोठ्या प्रमाणात नोकर भरती करण्यात यावी अशा आशयाचा एक ठराव देखील संमत करण्यात येत आहे. विदर्भ ग्रामीण बँक आणि महाराष्ट्र ग्रामीण बँक यांचे एकत्रीकरण झाल्यानंतर या बँकेची कार्यकक्षा वाढली आहे. या बँकेचा मोठ्या प्रमाणात शाखा विस्तार होण्याची आवश्यकता आहे. राज्यातील अनेक जिल्हा सहकारी बँका आजारी आहेत या पार्श्वभूमीवर या बँकेच्या वाढीची क्षमता आहे पण यासाठी मोठ्या प्रमाणात नोकर भरती करण्याची आवश्यकता आहे. आजही पुरेसा नोकरवर्ग उपलब्ध नसल्यामुळे अनेक शाखातून वाडीची क्षमता असून देखील आम्ही ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करू शकत नाही. कर्मचारी सतत तणावाखाली काम करत आहेत हे लक्षात घेता बँकेने महाराष्ट्र ग्रामीण बँकेतून सर्व स्तरातील कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात भरती करावी असा संघटनेतर्फे आग्रह धरण्यात येत आहे. याशिवाय महाराष्ट्र ग्रामीण बँकेतील सर्व कंत्राटी, बाह्यस्रोत, तात्पुरत्या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम कर्मचारी म्हणून सेवेत सामावून घ्यावे, सर्वस्तरातील कर्मचाऱ्यांसाठी निश्चित असे बदलीचे धोरण लागू करावे, १२ व्या द्विपक्ष कराराची पूर्णत्वाने अंमलबजावणी करण्यात यावी अशा मागण्या संघटनेतर्फे शिर्डी येथे भरत असलेल्या या अधिवेशनात करण्यात येत आहे. या अधिवेशनासाठी कॉ. देविदास तुळजापूर, कॉ. कैलास कानडे, कॉ. उत्तम भाकरे, कॉ. राहुल सावंत, कॉ. सुजय नळे, कॉ. किशोर लटपटे आदी प्रयत्नशील आहेत

# राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची निवडणूक संदर्भात ९ नोव्हेंबरला बैठक

नगर – अहिल्यानगर दक्षिण जिल्हा राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी – शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने ९ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वा. राष्ट्रवादी भवन, अहिल्यानगर येथे पक्षनिरीक्षक अंकुशराव काकडे यांचे प्रमुख उपस्थितीत, दक्षिण जिल्हाध्यक्ष दादाभाऊ कळमकर यांचे अध्यक्षतेखाली स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक संदर्भात बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. या बैठकीमध्ये होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद व नगर पंचायत निवडणुकांसंदर्भात विचार विनिमय या बैठकीमध्ये करण्यात येणार आहे. या बैठकीसाठी खा.निलेश लंके, आ.रोहित पवार, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, उत्तर जिल्हाध्यक्ष संदीप वर्पे, प्रताप ढाकणे, राजेंद्र फाळके यांचेसह स्थानिक स्वराज्य संस्थेचे आजी–माजी पदाधिकारी, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी कॉँग्रेस फ्रंटल सेलचे सर्व जिल्हाध्यक्ष, जिल्हा पदाधिकारी तसेच जिल्हा व तालुका कार्यकारिणी सदस्य उपस्थित राहणार आहेत. या प्रमुख बैठकीसाठी जिल्ह्यातील राष्ट्रवादी कॉँग्रेस प्रमुख पदाधिकारी, जिल्हा व तालुका कार्यकारिणी सदस्य यांनी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष दादाभाऊ कळमकर यांनी केले आहे.

# सीए फायनल परीक्षेत नगर येथील सौ.सायली गुगळे–चंगेडीया उत्तीर्ण

नगर – दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस् ऑफ इंडीया (नवी दिल्ली) यांच्यावतीने सप्टेंबरमध्ये घेण्यात आलेल्या सीए अंतीम परीक्षेत नगर येथील प्रेमदान हडकोतील रहिवासी सायली संजय चंगेडीया लग्नानंतर सौ. सायली सिद्धार्थ गुगळे (लोहसर, खांडगाववाला) उत्तीर्ण झाल्या आहेत. त्यांनी पी. एम. भंडारी यांच्याकडे आर्टिकलशिप पूर्ण केली. त्यांना सीए किरण भंडारी, सीए मुकेश काणकिया, सीए संदीप देसर्डा, सीए प्रसाद भंडारी व सौ. स्नेहलता ओहोळ यांचे मार्गदर्शन लाभले.



या यशाबद्दल त्यांना आई–वडील तसेच सासरे अजित गुगळे यांचे सहकार्य लाभले.

# आगामी निवडणुकीत गॅस सिलेंडर निशाणी आरक्षीत करण्यात यावे

नगर – वंचित बहुजन आघाडी हा नोंदणीकृत राजकीय पक्ष असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी या राजकीय पक्षाच्या वतीने उभे राहणाऱ्या सर्व उमेदवारांकरीता गॅस सिलेंडर ही निशाणी आरक्षीत करावी, अशी मागणी जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली.

भारत निर्वाचन आयोग सचिवालयाचे संदर्भ क्र. 56/Symbol/2024/PPS-11/ Vol.-XXX1/दि. २४/०८/२०२४ रोजीच्या पत्रान्वये, तसेच वंचित बहुजन आघाडीचे संदर्भ क्र.१०–२०२५/१९४ १४/१०/२०२५ रोजीच्या राज्य निवडणुक आयोगास दिलेले पत्र या संदर्भा अन्वये अहिल्यानगर जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी संतोष चोळके जिल्हाध्यक्ष, हनीफ शेख शहराध्यक्ष, सोमनाथ भैलुमे युवा जिल्हाध्यक्ष, जे डी शिरसाठ जिल्हा सल्लागार, रविकिरण जाधव नगर तालुकाध्यक्ष, ॲड. योगेश गुंजाळ, राजीव भिंगारदिवे, प्रवीण ओरे, फैरोज पठाण, दिनेश ससाणे, संजय पंचमुख, संजय शिंदे, पिनु भोसले, रवी भिंगारदिवे, संकेत शिंदे, प्रतीक ठोकळ, विश्वजित मोरे आदीसह कार्यकर्ते उपस्थित होते.



जिल्हाधिकारी यांना आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत गॅस सिलेंडर निशाणी आरक्षीत करण्यात यावी असे निवेदन योगेश साठे यांनी कार्यकर्त्यांसह दिले.



दिलीप काकडे तर उपाध्यक्षपदी राजू पाटकुले यांची निवड झाल्याबद्दल त्यांना नियुक्तीपत्र देताना सावेडी मंडलाचे अध्यक्ष सीए ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे.

# भारतीय जनता पार्टी सावेडी मंडलाच्या आध्यात्मिक आघाडीच्या अध्यक्षपदी दिलीप काकडे तर उपाध्यक्षपदी राजू पाटकुले यांची निवड

नगर – भारतीय जनता पार्टी सावेडी मंडलाच्या आध्यात्मिक आघाडीच्या अध्यक्षपदी दिलीप काकडे तर उपाध्यक्षपदी राजू पाटकुले यांची निवड करण्यात आली आहे. त्यांना सावेडी मंडलाचे अध्यक्ष सीए ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. शिंदे मळा येथील संत नामदेव महाराज मंदिरात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विठ्ठलराव वनारसे होते.

दिलीप काकडे व राजू पाटकुले हे मागील ३६ वर्षापासून संत शिरोमणी नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त शिंदे मळा येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करत असतात. तसेच कार्तिकी एकादशीला संत नामदेव महाराज जयंती उत्सवात नामदेव भजनी मंडळाच्या माध्यमातून भजन सेवा देत असतात. मागील पाच वर्षापासून निफाड ते पंढरपूर दिंडी सोहळ्यास दुपारची भोजन व्यवस्था करत आहेत.

यावेळी नियुक्तीबद्दल बोलताना दिलीप काकडे म्हणाले की, भाजपाने राम मंदिर बांधून पिढ्यान पिढ्याचे स्वप्न पूर्ण केले आहे. त्यामुळे हिंदू धर्माची पताका खांद्यावर घेऊन ती जगभर पोहोचण्यास हातभार लावता येईल.

उपाध्यक्ष राजू पाटकुले म्हणाले की, गेल्या ३० – ३५ वर्षांपासून आम्ही हरिनाम सप्ताह साजरा करत असतो, त्यामुळे आध्यात्मिक क्षेत्रात काम करण्याचे एक वेगळे समाधान मिळते आता त्याला या पदामुळे आणखी गती देता येईल.

विठ्ठलराव वनारसे म्हणाले, संत शिरोमणी नामदेव महाराजांच्या समाधी निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करत असतोच परंतु यावर्षीपासून भागवत महापुराण या मंदिरात सुरू करणार आहोत. आमच्या या दोन युवकांना भाजपा सावेडी मंडलाने आध्यात्मिक आघाडी मध्ये काम करण्याची संधी दिली त्याबद्दल अध्यक्ष सीए काळेंचे आभार मानतो.

यावेळी सौ. अरुणा काकडे, श्रीमती विमल पाटकुले, उषाबाई वडे, सौ. क्रांति काकडे, वंदना काकडे, लक्ष्मी पाटकुले, शितल चौकटे, मयुरी पाटकुले, विठ्ठलराव वनारसे, चंद्रकांत काकडे, निलेश चौकटे, सचिन काकडे, सौदागर सदावर्ते, महेश चौकटे, संपत मदने, शिवाजी मदने, योगेश रायकर, अजय बोरा, रोशन छाजेड, महेश राऊत, सुमित मोरे, रघुनाथ धस, गणेश चौकटे, संदीप वडे, चि.निरंजन काकडे, संस्कार चौकटे, सार्थक काकडे इ. उपस्थित होते.

# खुनाच्या गुन्ह्यातून न्यायालयाने केली निर्दोष मुक्तता

नगर – कराचीवालानगर येथे ८ नोव्हेंबर २०२० रोजी संध्याकाळी ६.३० वाजेच्या सुमारास रमेश हिवाळे याने फिर्यादी यांचे वडील रामदास प्रभुणे यांना बोल्हेगाव येथून कामाचे निमीत्ताने अहमदनगर शहरात घेवून येवून कराचीवालानगर येथील मोकळ्या मैदानात आपआपसात वाद झाल्याने त्याचा राग मनात धरून आरोपीने मयत यांचे डोक्यात गंभीर दुखापत करून जिवे ठार मारले, अशी फिर्याद तोफखाना पोलीस स्टेशन येथे दिली होती. सदर गुन्ह्याचा तपास करून हिवाळे यांचे विरूद्ध अहिल्यानगर येथील कोर्टात दोषारोपपत्र दाखल केले. सदर प्रकरणात सरकार पक्षातर्फे एकुण ५ साक्षीदार तपासण्यात आले. त्यामध्ये तपासी अंमलदार व वैद्यकिय अधिकारी यांची साक्ष महत्वाची ठरली. सदर हिवाळे यांच्या वकीलांनी सदर साक्षीदारांचे उलटतपासातून गुन्ह्याच्या तपासातील त्रुटी व फिर्यादी यांनी केलेली खोटी केस मे. न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. सदर प्रकरणात सरकार पक्षातर्फे जोरदार युक्तीवाद करण्यात आला. सदर संपुर्ण युक्तीवाद हिवाळे यांचे वकील ॲड. सुहास टोणे यांनी सदर युक्तीवाद पुर्णपणे खोडून हिवाळे यांची बाजू भक्कमपणे न्यायालयात मांडली. सदर केसमध्ये ६ नोव्हेंबर २०२५ रोजी न्यायालयाने गुणदोषांवर निकाल देत रमेश हिवाळे यांना निर्दोष मुक्त केले. हिवाळे यांचे निर्दोषत्व न्यायालयात सिध्द झालेले आहे.

हिवाळे यांच्यातर्फे ॲड. सुहास. एस. टोणे यांनी न्यायालयात बाजु मांडली. त्यांना ॲड. शिवानी सापिके, ॲड. अमित अडागळे, ॲड. विजय केदार, ॲड. विलास ढोणे, ॲड. गौरव हरबा, ॲड. ओमगोपाल गुंड यांनी सहकार्य केले.

# सकल जैन समाजातील साधू साध्वी भगवंतांना विहार दरम्यान पोलीस सुरक्षा व इतर सुविधा देण्यासंदर्भात प्रशासनाचे आदेश

## मिशन सेफ विहार ग्रुप अध्यक्ष यश शहा यांच्या मागणीला यश

नगर – जैन समाजाचा चातुर्मास पर्व ५ नोव्हेंबर रोजी संपत असून तात्काळ सकल जैन समाजातील साधू आणि साध्वीजी गुरुभगवंतांचा विहार पदभ्रमण चालू होत आहे. सकल जैन समाजातील साधू साध्वीजी गुरूभगवंत मोठ्या प्रमाणात अहिल्यानगर जिल्ह्यातून विहार पदभ्रमण करत असतात. त्यांचा विहार सुखरूप, सुरक्षित व्हावा या अनुषंगाने मिशन सेफ विहार ग्रुप चे संस्थापक अध्यक्ष इंजिनियर यश प्रमोद शहा यांनी सकल जैन अल्पसंख्यांक समाजाच्या वतीने मुख्यमंत्री तसेच जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलिस अधीक्षक अहिल्यानगर यांना ई–मेल द्वारे तसेच फोन द्वारे निवेदन पाठवून मागणी केली होती की ५ नोव्हेंबरपासून चातुर्मास समाप्ती नंतर तात्काळ अल्पसंख्यांक जैन साधू साध्वी गुरु भगवंत यांचे विहार पदभ्रमण चालू होत आहे. या पदभ्रमण विहार दरम्यान अहिल्यानगर जिल्ह्यात आपण जिल्हा प्रशासन, जिल्हा पोलीस प्रशासन तसेच या संबंधित सर्व शासकीय अधिकारी तसेच विभागाला तात्काळ सूचना कराव्यात की विहार दरम्यान गुरु भगवंतांना पोलीस संरक्षण तसेच ज्या ठिकाणी आवश्यक असेल त्या ठिकाणी जिल्ह्यात शासकीय शाळा, महाविद्यालय, कार्यालय व इतर सार्वजनिक ठिकाणी तात्पुरत्या काही कालावधी करिता विहार दरम्यान मुक्कामाचे सुविधा, प्रवचन करिता सार्वजनिक ठिकाणी जागा उपलब्ध करून देण्यात यावी या संबंधात जिल्हा प्रशासन वतीने संबंधितांना सूचना कराव्यात, अशी मागणी शहा यांनी केली होती.



अहिल्यानगर जिल्हा प्रशासनाचे सकल जैन समाजातील साधू साध्वी भगवंतांना विहार दरम्यान पोलीस सुरक्षा व इतर सुविधा देण्यासंदर्भातील मागणीचे निवेदन देताना मिशन सेफ विहार ग्रुप अध्यक्ष यश शहा.

अप्पर जिल्हा दंडाधिकारी अहिल्यानगर व जिल्हा प्रशासनाने यश शहा यांच्या या ईमेल ची तात्काळ दाखल घेत यासंदर्भातील आदेश परिपत्रक तात्काळ जारी केले आहेत व या संदर्भातील आदेशाची प्रभावीपणे तात्काळ कार्यवाही करण्यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पोलिस अधीक्षक, आयुक्त महानगरपालिका, प्रशासन अधिकारी नगरपालिका प्रशासन, जिल्हा पोलीस प्रशासन, जिल्हा परिषद व महानगरपालिका यांना यासंदर्भातील सर्व सहकार्य विहार दरम्यान करण्याचे पत्रकाद्वारे कळवले देखील आहे.

यासोबतच यश शहा यांनी मुख्यमंत्री कार्यालय, अल्पसंख्यांक विभाग यांना देखील संपूर्ण महाराष्ट्रात विहार दरम्यान पोलीस सुरक्षा देण्यासंदर्भातील पत्र ई–मेल द्वारे पाठवले आहे. शहा यांच्या ईमेलचे दखल घेत मुख्यमंत्री कार्यालयाने तात्काळ पुढील कार्यवाही करण्यासाठी या संदर्भात संबंधित गृह विभाग शाखा आणि पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांनी पाठवले असल्याचे ईमेल द्वारे शहा यांना कळवले आहे.

मिशन सेफ विहार अध्यक्ष नात्याने शहा यांनी अहिल्यानगर जिल्हा प्रशासनाचे पत्रक ईमेल द्वारे तसेच फोन द्वारे विशेष पोलीस महानिरीक्षक तसेच पोलिस अधीक्षक, पोलीस उपाधीक्षक, जिल्हा पोलिस प्रशासन सर्व संबंधित शाखा, पोलीस कंट्रोल रूम, सर्व पोलीस निरीक्षक, जिल्हा परिषद, महानगरपालिका आणि संबंधित सर्व विभागांना तात्काळ पाठवले आहे. व सकल जैन समाजाच्या वतीने मागणी केली आहे की या संदर्भातील सर्व सरकारी यंत्रणांना तात्काळ पत्रकाद्वारे आदेश द्यावे.

अहिल्यानगर जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर चातुर्मास संपल्यानंतर साधू साधू भगवान त्यांचा विहार होत असतो यादरम्यान त्यांचा विहार सुखरूप, सोयीस्कर व्हावा यासाठी आपण सर्व सहकार्य करण्याची मागणी सकल जैन समाजाच्यावतीने केली आहे.

